www.dainikmahabharat.com ● RNI No. MAHMAR/2015/64418 ● jaymahabharat2015@gmail.com

दैनिक

# महाभारत

संपादक - विजयकुमार वाव्हळ

महाराष्ट्र ● बीड (महाराष्ट्र) ●दैनिक ●मराठी ●वर्ष - १० ●अंक २७० ● सोमवार दि.१२ मे २०२५ ● किंमत २ रू. ● पाने ६

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक



## ...म्हणून पाकिस्तानने सादर केला शस्त्रसंधीचा प्रस्ताव

नवी दिल्ली : पाकिस्तान आणि भारत यांच्यात सुरू झालेली लढाई आणखी तीव्र होईल असे वाटत असतानाच दोन्ही देशांनी शस्त्रसंधी करत असल्याचे जाहीर केले. या निर्णयामुळे अनेकजण चक्रावले. वेगवेगळे तर्कवितर्क सुरू झाले. पण ज्यांनी या घडामोडी अतिशय जवळून बघितल्या त्यांना पाकिस्तानने शस्त्रसंधीचा प्रस्ताव का सादर केला हे व्यवस्थित समजले. भारताच्या हवाई हल्ल्यांमध्ये पाकिस्तानच्या ११ हवाई तळांचे नुकसान झाले. हे तळ वापरता येणार नाही अशा स्थितीत पोहोचले.


अमेरिकेच्या दबावाला झुगारून पाकिस्तानचे दोन तुकडे करत जगाचा भूगोलच बदलून टाकणाऱ्या माजी पंतप्रधान स्व. इंदिराजी गांधी यांची आज देशाला प्रखरतेने आठवण येत आहे!

नाना पटोले



१९७१ च्या युद्धात अमेरिकेविरुद्ध ढाल बनून भारतीय नौदलाचे रक्षण करणाऱ्या याच रशियन पाणबुड्या आहेत ५० वर्षांपूर्वी १९७१ मध्ये अमेरिकेने भारताला १९७१ चे युद्ध थांबवण्याची धमकी दिली होती. चिंतेत असलेल्या भारताने सोव्हिएत युनियनला एक संदेश पाठवला. ही कहाणी भारतीय इतिहासाच्या पुस्तकांमधून जवळजवळ पुसून टाकण्यात आली आहे.

जितेंद्र आव्हाड



स्व. आर. आर. पाटील (आबा) यांच्या गुणवैशिष्ट्याचे विविध पैलू लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर साहेब यांनी आज त्यांच्या 'अन्यथा' या सदरात उलगडून दाखवले आहेत 'राजकारणाच्या रोगट वातावरणात राहूनही आबा कायम निरोगी राहिले' हे त्यांचं आकलन मनाला भावलं

रोहित पवार



गेल्या काही दिवसांत भारतीय लष्कराने दाखवलेला पराक्रम प्रत्येक नागरिकाच्या हृदयात गर्व निर्माण करणारा आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याला आपल्या शूर जवानांनी जे उत्तर दिले, त्यातून पाकिस्तानसारख्या देशांना स्पष्ट संदेश गेला आहे की, भारत आपल्या सीमांचे आणि नागरिकांचे रक्षण करण्यात कधीही कमी पडणार नाही.

रुपाली चाकणकर



# जगातील सर्वात मोठ्या गोवर्धन गोशाळेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

कणकवली : करंजेच्या माळरानावर उभे झालेले नंदनवन म्हणजे कै. तातु सिताराम राणे ट्रस्ट संचलीत गोवर्धन गोशाळा! या गोशाळेचा दिमाखदार शुभारंभ रविवारी ११ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,माजी केंद्रीय मंत्री खा. नारायण राणे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे, आ. निलेश राणे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व मंत्रीगण उपस्थित होते.

हिरव्या वनराईने नटलेल्या, निसर्गरम्य करंजे गावात सुमारे ७० एकर जागेत अत्याधुनिक 'गोशाळा' उभारण्यात आली आहे. या गोशाळेत गीर, साहीवाल, देवणी, पुंगनूर आदी भारतातील व महाराष्ट्रातील विविध जातींच्या तसेच खिल्लार, स्थानिक कोकण कपिला अशा विविध गायी आहेत. करंजे गावातील गोशाळेत दुधापासून तयार केले जाणारे विविध पदार्थ विक्रीसाठी ठेवले जाणार आहेत. गोमूत्र वापरुन तयार केलेली ओषधे, खते, गोबरगॅस आणि रंग यांची खरेदी या गोशाळेच्या माध्यमातून लवकरच करता येईल.



करंजेमध्ये गोशाळेसह शेळी - मेंढीपालन, कुक्कुटपालन हे प्रकल्पही लवकरच सुरू केले जाणार आहेत. या प्रकल्पांमुळे करंजे तसेच आसपासच्या गावांतील तरुण - तरुणींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. पशुपालन, दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालन, खत निर्मिती,दुग्धजन्य पदार्थ निर्मिती आदी विषयावर विविध चर्चासत्रे, अभ्यास शिबीरे, कार्यशाळा घेण्याचेही गोशाळेचे नियोजन आहे. या कार्यक्रमांमध्ये तज्ज्ञ मंडळी मार्गदर्शन करणार आहेत.

## छत्तीसगडच्या रायपूरमध्ये भीषण अपघात, १३ जणांचा मृत्यू



रायपूर: छत्तीसगडची राजधानी रायपूरमध्ये भीषण रस्ते अपघात झाला आहे. रायपूर-बालोदाबाजार मार्गावर सरागांवजवळ रविवारी रात्री उशिरा एक ट्रक आणि ट्रेलर यांच्यात टक्कर झाली. या अपघातात कमीत कमी १२ जणांचा मृत्यू झाला आहे तर अनेकजण जखमी झालेत.

जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांमध्ये ९ महिला, २ मुली, एक किशोरवयीन तर ६ महिन्याच्या बाळाचा समावेश आहे.

या ट्रेलरमधून लोक बाळाच्या सहा महिन्याच्या कार्यक्रमावरून परतत होते. मत्यू पावलेले हे सर्व लोक छत्तीसगडच्या चटौद गावाचे निवासी पुनीत साहू यांचे नातेवाईक होते.

रायपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात त्यावेळेस झाला जेव्हा हे सगळे लोक कार्यक्रमावरून परतत होते. जखमींना उपचारासाठी रायपूरच्या डॉ. बी. आर. आंबेडकर मेमोरियल रुग्णालय आणि खरसोरा आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. जखमींमध्ये मुले आणि महिलांचा समावेश आहे.

# १०३४ ग्रामपंचायतीत बसवणार सीसीटीव्ही

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या संकल्पनेतून उपक्रम

बीड /प्रतिनिधी


जिल्ह्यातील ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये सुरक्षा, पारदर्शकता आणि सामाजिक शिस्तीला चालना देण्यासाठी ई-दृष्टी प्रकल्प जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील महत्त्वाच्या ठिकाणी उच्च दर्जाचे, नाईट व्हिजन सुविधा असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिली.

गाव पातळीवर सुरक्षा वाढवून चोरी, वाद व गैरकृत्यांवर नियंत्रण ठेवणे, शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे आणि महिला-मुलांच्या सुरक्षिततेसाठी देखरेख, सामाजिक शिस्त आणि नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करणे, आपत्ती व आपत्कालीन परिस्थितींमध्ये त्वरित प्रतिसाद देणे, आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांचे व रुग्णांचे संरक्षण, शासकीय व ग्रामपंचायतीच्या मालमत्तेचे रक्षण, स्वच्छता व नियमांचे पालन यावर देखरेख, कार्यालयीन कामकाजावर नियंत्रण ठेवून





पारदर्शकता वाढवणे या उद्देशांसाठी ई दृष्टी प्रकल्प जिल्ह्यात राबवण्यात येणार आहे. प्रकल्पातून जिल्ह्यात प्रत्येक गावात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. २० मे ते १४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत हे काम पूर्ण करायचे आहे. बसवण्यात येणाऱ्या कॅमेऱ्यांचे रेकॉर्डिंग किमान १५ दिवस जतन करणे आवश्यक आहे. १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत जिओटॅग फोटोसह कॅमेऱ्यांची माहिती सादर करणे आवश्यक आहे. या प्रकल्पाअंतर्गत शाळा, अंगणवाडी, चावडी, आरोग्य केंद्र/उपकेंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, प्रमुख चौक व सार्वजनिक स्थळे या ठिकाणी किमान ५ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वेळेत प्रकल्प पूर्ण करा : ई-दृष्टी प्रकल्पामुळे ग्रामपंचायत क्षेत्रात सुरक्षा, पारदर्शकता आणि जबाबदारी यांचा दर्जा मोठ्या प्रमाणात उंचावेल. हा प्रकल्प वेळेत व काटेकोरपणे पूर्ण करण्यात यावा. - विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी






# भारत दरवर्षी १०० ब्रम्होस मिसाइल बनवणार - संरक्षणमंत्री राजनाथ सिंह

प्रतिनिधी । लखनऊ

भारताच्या संरक्षण क्षेत्रात एक ऐतिहासिक पाऊल पडले असून, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी रविवारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे लखनऊ येथील ब्रह्मोस एरोस्पेस इंटिग्रेशन आणि टेस्टिंग सुविधेचे उद्घाटन केले. या सुविधेमुळे दरवर्षी १०० ब्रह्मोस मिसाइलांचे उत्पादन शक्य होणार आहे. संरक्षणमंत्र्यांनी याला राष्ट्रीय प्रौद्योगिकी दिनाशी जोडत १९९८ च्या पोखरण अणुपरिक्षणाची आठवण करून दिली आणि भारताच्या वैज्ञानिक क्षमतेचे कौतुक केले.







राजनाथ सिंह म्हणाले, ही सुविधा देशाच्या संरक्षण सामर्थ्याला बळ देणारी आहे. डीआरडीओ, वैज्ञानिक आणि अभियंत्यांच्या मेहनतीला मी सलाम करतो. त्यांनी या प्रकल्पाला देशातील तरुण, अभियंते आणि वैज्ञानिकांचे यश असल्याचे नमूद केले.या कार्यक्रमात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत ब्रह्मोस मिसाइलाच्या सामर्थ्याची प्रशंसा केली. ते म्हणाले, पाकिस्तानला ब्रह्मोसची ताकद माहीत आहे. या मिसाइलाने दहशतवाद्यांना धडा शिकवला. भारतीय वायुसेनेनेही ऑपरेशन सिंदूरच्या यशस्वी अंमलबजावणीची पुष्टी केली. हे ऑपरेशन राष्ट्रीय हितासाठी गोपनीय आणि सुनियोजित पद्धतीने सुरू आहे.

दरम्यान,भारत-पाकिस्तान दरम्यान नियंत्रण रेखेवर तणाव वाढला आहे. शनिवारी शांती करारानंतरही पाकिस्तानने घुसखोरी केल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी उच्चस्तरीय बैठक झाली. यापूर्वी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने पहलगाम हल्ल्याचा बदला घेत पाकिस्तानातील ९ दहशतवादी ठिकाणांवर २४ मिसाइले डागली होती. भारताने पाकिस्तानचे ड्रोन आणि मिसाइल हल्लेही यशस्वीपणे हाणून पाडले. ही सुविधा भारताच्या संरक्षण सज्जतेला नवी उभारी देणारी ठरेल.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची आमदारकी धोक्यात?

प्रतिनिधी । नागपुर

विधानसभा निवडणुकीत घोळ झाल्याची शंका व्यक्त करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विजयाला आव्हान देणारी निवडणूक याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली आहे.नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातून फडणवीस यांनी विजय प्राप्त केला होता. काँग्रेसचे उमेदवार प्रफुल्ल गुडधे पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करत फडणवीस यांची आमदारकी रद्द करण्याची विनंती केली आहे. उच्च न्यायालयाने याप्रकरणात देवेंद्र फडणवीस यांना समन्स बजावत जबाब नोंदविण्याचे आदेश दिले होते. फडणवीस यांनी आता उच्च न्यायालयात अर्ज दाखल करत भूमिका स्पष्ट केली आहे.



फडणवीसांवर आरोप काय?

निवडणुकीत कायदेशीर प्रक्रियेचे पालन करावे लागते. मात्र, ईव्हीएमने निवडणूक घेण्यापूर्वी या कायदेशीर प्रक्रियेची पूर्तता निवडणूक आयोगाने केली नाही. ईव्हीएमने निवडणूक घ्यायची असल्यास काही निकष देण्यात आले होते. याची कारणेही स्पष्ट करावी लागतात. तेसुद्धा केले नाही. एवढेच नव्हे तर ईव्हीएमने निवडणूक घेण्यासाठी नोटिफिकेशनसुद्धा निवडणूक आयोगाने काढले नसल्याचा आरोप याचिकाकर्ते गुडधे यांनी याचिकेत केला. निवडणुकीच्या निकालानंतर पराभूत उमेदवारांनी मागणी केल्यानंतरही सीसीटीव्हीचे फुटेज, फॉर्म नंबर १७ दिले जात नाही. पाच व्हीव्हीपॅटची फेरमोजणी करण्यास मान्यता आहे. अनेकांनी याकरिता पैसे भरले आहेत. मात्र, व्हीव्हीपॅटची मोजणीसुद्धा केली जात नाही, असेही याचिकेत नमूद करण्यात आले.

# शेकाप नेते श्री.जे एम म्हात्रे यांचा भाजप प्रवेश

## रायगड जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलणार

नवी मुंबई / संतोष वाव्हळ
(दै.महाभारत)

शेकडो समर्थकांच्या उपस्थितीत शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते व पनवेलचे मा.नगराध्यक्ष श्री.जे. एम. म्हात्रे आणि पनवेल महानगरपालिकेचे मा. विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. हा भव्य पक्षप्रवेश सोहळा शनिवार, १० मे रोजी उलवे नोड येथे पार पडला.

भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, माहिती-तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, मा.खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार पंडीतशेठ पाटील,भाजपाचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, मा.रा.जी.प. उपाध्यक्ष आस्वादशेठ पाटील, तसेच भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. या वेळी शेतकरी कामगार पक्षाचे मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि समर्थकांनी उपस्थित राहून जोरदार शक्तीप्रदर्शन केले.

याप्रसंगी जाहीर सभेला संबोधित करताना भाजपा कार्यकारी अध्यक्ष-महाराष्ट्र प्रदेश रविंद्र चव्हाण यांनी सांगितले देशाचे कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदीजी देशाची तर राज्याचे कुशल नेतृत्व मुख्यमंत्री फडणवीस राज्याची ताकद आहे. त्यांच्या नेतृत्वात देश आणि राज्य पुढे यशस्वी मार्गक्रमण करत आहे. तळागाळातील कार्यकर्ते समाज बांधवांच्या समस्याचे निराकरण करण्याची जबाबदारी त्यांनी घेतली आहे. सन २०४७ ला आपला देश महासत्ता होणार आहे. त्यात महाराष्ट्राचा वाटा असला पाहिजे यासाठी सन २०२८ च्या अगोदर तीन ट्रिलियनची अर्थव्यवस्था करण्याचे उद्दिष्ट देवेंद्रजींनी ठेवले आहे. त्यामुळे महाराष्ट्र आता कोणत्याही क्षेत्रात कमी पडणार नाही. जे. एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांनी त्यांच्या असंख्य पदाधिकारी कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. अशा या पक्षात तुम्ही आज सहभागी झाला आहात याचा निश्चित तुम्हाला अभिमान वाटेल.



आपल्या भाषणात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की ,मा.नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, मा. विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे हे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे व्यक्तिमत्व आहे. भाजप जिल्हयात एक नंबरचा पक्ष बनत आहे. खासदार, आमदार, ते सरपंच लोकप्रतिनिधी तळागाळातील लोकांसाठी काम करत आहेत. २०१८ साली रविंद्रजी चव्हाण रायगडचे पालकमंत्री झाले आणि जिल्ह्यातील एक एक करत निवडणुका जिंकत गेलो. आता प्रत्येक स्तरावर भाजपचे नेतृत्व आहे. कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार जनतेसाठी अग्रेसरपणे काम करत आहे. देश हितासाठी काम करणाऱ्या पक्षात आलो आहोत याचा तुम्हाला नक्कीच समाधान आणि अभिमान वाटेल. पनवेल, उरण, खालापूर मधून तुमच्यासोबत आलेल्या कार्यकर्त्यांच्या या प्रवेशामुळे पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रितम म्हात्रे हे समाजाला जोडले आहेत तर जे. एम. म्हात्रे पक्षभेद बाजूला ठेऊन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सोबतीने काम करत आहेत. आजच्या या प्रवेशाने ताकद वाढली आहे. आजचा पक्षप्रवेश आणि झेंडा देशप्रेमाचा आहे, त्यामुळे आगामी जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत समिती, ग्रामपंचायत निवडणुका शंभर टक्के जिंकणार याची मला खात्री आहे. पक्षात जुना नवा असा कोणताही विचार न करता एकसंघ काम करत राहू या असे आमदार महेश बालदी यांनी सांगितले

जे एम म्हात्रे आणि प्रितम म्हात्रे यांच्यासोबत शेकापचे विविध पदाधिकारी, जिल्हा चिटणीस, आघाड्यांचे प्रमुख, मा.नगराध्यक्ष, मा.उपनगराध्यक्ष, मा. नगरसेवक, मा.जिल्हा परिषद सदस्य, मा.पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तसेच शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. भविष्यातील राजकीय घडामोडींना दिशा देणारा हा पक्षप्रवेश म्हणून रायगड जिल्ह्यात पाहिले जात आहे.

१९ मा.नगरसेवक, ४ मा. जिल्हा परिषद सदस्य, ४ मा.पंचायत समिती सदस्य,३ मा.नगराध्यक्ष, २ मा. उपनगराध्यक्ष, २६ सरपंच,१८ उपसरपंच,६३ ग्रामपंचायत सदस्य, असे आजी आणि माजी अनेक पक्षाच्या विविध पदाधिकाऱ्यांनी माझ्यासोबत भाजपामध्ये प्रवेश केलेला आहे. आपल्या विभागात आंतरराष्ट्रीय दि बा पाटील साहेबांच्या नावाने विमानतळ बनत आहे , हजारो रोजगार या ठिकाणी भविष्यात येणार आहे.आपल्या विभागातील तरुणांना मोठ्या प्रमाणात येथे नोकरीची आणि व्यवसायाची संधी आहे. रायगड जिल्ह्यात नव्याने उद्योगधंदे येत आहेत या ठिकाणी खूप मोठी रोजगार निर्मिती होणार आहे. त्या ठिकाणी आवश्यक ते मनुष्यबळ तयार करण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून विविध प्रशिक्षण योजना आहेत त्या राबवून काम करण्याचा माझा मानस आहे

## अवकाळी पावसात वीज पडून सायगाव येथे शेतमजूर तर सुगाव येथे एक म्हैस ठार

### तहसीलदार विलास तरंगे यांनी पंचनामा करून अहवाल पाठविण्याचे दिले आदेश

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै. महाभारत )

अंबाजोगाई तालुक्यात दिनांक ११/ ५ /२०२५ रोजी पुन्हा एकदा वादळीवारा आणि विजेच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने पुन्हा हजेरी लावली असता यामध्ये अंबाजोगाई तालुक्यातील सायगाव येथे एका शेतमजुराचा तर सुगाव येथे एका म्हैशीच्या अंगावर वीज कोसळून दगावल्याची घटना घडली आहे. यासंदर्भात अंबाजोगाई चे तहसीलदार विलास तरंगे यांनी ताबडतोब संबंधित तलाठी व मंडळ निरीक्षक यांना सूचना देऊन पंचनामा करण्याचे आदेश दिले.

दरम्यान अंबाजोगाई शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी दिनांक ११ मे २०२५ रविवार रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या दरम्यान पडलेल्या अवकाळी वादळी वाऱ्यासह पावसाने शेतकरी असा हा सर्वसामान्य जनतेची मोठी धावपळ उडवली, अंबाजोगाई शहरासह इतर ठिकाणी वारा आणि विजयांचा कडकडाटासह पाऊस कोसळला. या अवकाळी वादळी वाऱ्यासह कोसळलेल्या पावसात सायगाव येथील शेतमजूर भारज रस्त्यावरच्या शेतात काम करत असताना अचानक वादळी वाऱ्यासह पाऊस आल्याने याच्या पासून बचाव करण्यासाठी लिंबाच्या झाडाच्या आश्रयाला गेले असता अचानक वीज कोसळून यात शेतमजूर असलेल्या दिगंबर शंकर गायकवाड (६०) यांच्या अंगावर वीज कोसळून ठार झाल्याची घटना घडली तर जवळच असलेल्या सुगाव येथील शेतकरी सत्तार आमिरखान पठाण यांच्या शेतात झाडाखाली बांधलेल्या म्हैसवर वीज कोसळून म्हैस दगावली. यामध्ये शेतकऱ्याचे अंदाजे ८० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती समजते. सायगाव शिवारात एका शेतकऱ्याचा मृत्यू तर सुगाव शिवारात म्हैस दगावल्याची घटना घडली. दरम्यान वीज पडून ठार झालेल्या शेतमजूर , व म्हशीचा महसूल विभागाने घटनास्थळी पंचनामा करून ताबडतोब आर्थिक मदत करण्याची मागणी करण्यात येत आहे..

## जल आंदोलनाने विविध प्रयत्नाला यश मिळण्याचे संकेत

दै. महाभारत / मंगरूळपीर
दिलीप अवगण पाटील

मंगरूळपीर :ऋ-सोनल प्रकल्पातील पाणी कालव्याला सोडण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग कोठाळे यांनी संबंधीत विभागाला निवेदन दिले होते. यामध्ये त्यांनी १० मे पर्यंत पाणी न सोडल्यास जल समाधी आंदोलन करण्याचा ईशारा दिला होता.मात्र संबंधीत विभागाने याची कुठलीही दखल न घेतल्याने त्यांनी परिसरातील शेतकऱ्यांसह सोनल प्रकल्पात जलसमाधी आंदोलनाला केले.

शेलुबाजार, वनोजा परिसरात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या फळबागा ही सुकत चालल्या आहेत. तर गुराढोरांचाही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे सोनल प्रकल्पातील पाणी कालव्यात सोडण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र संबंधीत विभागाला याबत निवेदन देऊनही याची दखल न घेतल्यामुळे कोठाळे यांनी परिसरातील शेतकऱ्यांनसह सकाळी ११ वाजता पासून



जलसमाधी आंदोलन सुरू केले होते.यावेळी जऊळका पोलीस स्टेशनचे ठाणेदार पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मात्र सुरवातीला मार्ग निघाला नाही. यानंतर ४ वाजता कार्यकारी अभियंता श्रीपाद पिदडी यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन चर्चा केली. यावेळी मंगळवार पर्यंत काही कागदपत्रांची पूर्तता करून आणि गेटची दुरुस्ती करून कालव्यामध्ये पाणी सोडण्याचे आश्वासन दिले. कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या आश्वासनला प्रतिसाद देत आंदोलन मागे घेण्यात आले. सोनल प्रकल्पाचे सोनल प्रकल्पाच्या उपविभागीय अभियंता सागर चौधरी, शाखा अभियंता मनोज उपासने, मोजणीदार राहुल भगत, कनिष्ठ लिपीक शेषराव हिवराळे, कालवा चौकीदार किरण भांगे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.तर आंदोलन कर्ते शेतकरी विजय सावके, कुलदीप इंगोले, अजिंक्य बारड, राम सुर्वे, विशाल जागृत, गजानन येवले, समाधान राऊत, बंटी नाकाडे, भागवत काळे, दिलीप ठाकरे, अभिषेक ठाकरे, देवानंद जावळे तसेच नारायणराव बारड, संजय राऊत, नरेंद्र राऊत, किशोर राऊत, हरीश पवार, पंकज इंगोले यांच्या सह परिसरातील अन्य शेतकरी उपस्थित होते.याप्रसंगी जऊळका पोलिस स्टेशन ठाणेदार गणेश हिवरकर, जमदार पंजाब घुगे, विनोद दामोदर, गोपाल कव्हर व इतर कर्मचारी उपस्थित होते.

आज सोनल प्रकल्प येथे शेतकऱ्यांसाठी पाणी सोडण्यासाठी जलसमाधी आंदोलनाचा इशारा पाटबंधारे विभागाला दिला होता. सकाळी ११ वाजता सुरू झालेले आंदोलन यशस्वी वाटाघाटी नंतर कार्यकारी अभियंता पिदडी यांच्या पाणी सोडण्याच्या आश्वासना नंतर दुपारी ४ वाजता स्थगित करण्यात आले. आज या आंदोलनात सहभागी सर्व माझे सहकारी, पाठीराखे, पंचक्रोशीतील येडशी, वनोजा, तपोवन, तर्हाळा,नागी, लाठी, हिरंगी, चोरद,शेलुबाजार, ईचा, गोग्री, खेर्डा, चिखली येथील शेतकरी उपस्थित होते.

## दुचाकींच्या दोन अपघातात ४ जणांचा मृत्यू ट्रॅक्टर अन् डिव्हायडरला धडकल्याने भीषण दुर्घटना

यवतमाळ : राज्यातील रस्ते अपघाताच्या घटना काही केल्या कमी होताना दिसत नाहीत. दररोज अपघाताच्या दुर्घटनेत प्रवाशांनी जीव गमावल्याचे वृत्त ऐकायले मिळते. कधी चार चाकी तर कधी दुचाकी वाहनांचे अपघात होतात. खराब रस्ते, ड्रंक अँड ड्राईव्ह आणि हायस्पीड वाहनांमुळे अपघात होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यातच, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या दुचाकी अपघातात ४ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. एका अपघातात दुचाकी डिव्हायडरला धडल्याने अपघात झाला, तर दुसऱ्या अपघातात ट्रॅक्टरला दुचाकी धडकून झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील नागपूर तुळजापूर मार्गावरील बलवंत मंगल कार्यालयासमोर दुचाकी डिव्हायडरला धडकल्याने दुचाकीवरील दोघेजण जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडली. प्रेम संतोष बावणे आणि रोहित आमटे असे मृतकाचे नाव आहे. वाघाडी येथून दोघेजण यवतमाळकडे येत असताना हा भीषण अपघात झाला. सध्या येथील उड्डाण पुलाचे काम सुरू आहे, हे काम सुरू असताना डिव्हायडर हे रस्त्याच्या मधोमध आहेत. त्यामुळे, या मार्गावरुन ये-जा करणाऱ्या कोणत्याही प्रवाशांना हे डिव्हायडर दिसत नाहीत. त्यामुळेच, हे अपघात होत असल्याचे तेथील स्थानिकांचे म्हणणे आहे. मात्र, आजच्या अपघातात दोन युवकांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केलाय.



### ट्रॅक्टरला दुचाकीची धडक, दोघे ठार

गडचिरोलीवरुन चामोर्शीकडे येत असताना कुरुड बस थांब्याजवळ उभ्या ट्रॅक्टरला दुचाकीची जोरदार धडक बसली. या भीषण अपघातात घटनास्थळीच दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. प्रतीक नीलकंठ निमसरकार (वय २६ वर्षे), सचिन विनायक रोहणकर (वय २६ वर्षे) अशी मृतांची नावे असून दोघेही चामोर्शी तालुक्यातील रहिवासी आहेत. मृतकांना शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णलाय चामोर्शी येथे आणण्यात आले असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ऑपरेशन अभ्यास मॉक ड्रिल ठाण्यात यशस्वी; आपत्कालीन तयारीची प्रभावी चाचणी

ठाणे/ बी.डी.गायकवाड :--केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजित करण्यात आलेले आपत्कालीन परिस्थितीसाठीच्या सज्जतेचे परीक्षण करणारे ऑपरेशन अभ्यास हे मॉक ड्रिल आज, दि. ११ मे २०२५ रोजी ठाण्यातील लोढा अमारा, कोलशेत मैदानावर यशस्वीरित्या पार पडले. दुपारी साडेचार वाजता सायरन वाजवून या मॉक ड्रिलची सुरुवात झाली आणि त्यानंतर पूर्वनियोजित घटनाक्रमाप्रमाणे सर्व कार्यवाही अत्यंत प्रभावीपणे पार पडली.

जिल्हाधिकारी तथा नागरी संरक्षण दलाचे नियंत्रक अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने व प्रांताधिकारी उर्मिला पाटील, नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसिलदार उमेश पाटील, नायब तहसिलदार दिनेश पैठणकर, उपमुख्य क्षेत्ररक्षक बिमल नथवाणी, कमलेश श्रीवास्तव, विभागीय क्षेत्ररक्षक रुपेश निंबाळकर, अयुब शिकलगार, झहीर खान, शकुंतला राय, बुद्धदास जाधव, अरुण सातपुते, प्रमोदिनी जाधव, श्री.भुजबळ, मानसेवी निदेशक डॉ.प्रकाश ठमके यांच्या सक्रिय पुढाकारातून हे मॉक ड्रिल आयोजित करण्यात आले होते.

मॉक ड्रिलच्या दरम्यान, काल्पनिक परिस्थितीत एअर स्ट्राईक/बॉम्ब हल्ल्याची सूचना देण्यात आली. यानंतर नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचण्यासाठी त्वरित सूचनांचे प्रसारण करण्यात आले. नागरिकांनी कोणताही गोंधळ अथवा धावपळ न करता शांतपणे प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन केले आणि सुरक्षितस्थळी आश्रय घेतला. त्यानंतर, संबंधित परिसरात शोध मोहीम राबवून जखमी तसेच अडकलेल्या ४० नागरिकांना तात्काळ बाहेर काढण्यात आले आणि त्यांना प्रथमोपचार पुरविण्यात आले. इमारतीत अडकलेल्या ५ जणांची सुरक्षितपणे सुटका करण्यात आली.

या संपूर्ण कार्यवाहीदरम्यान, सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यंत गांभीर्याने सहभाग घेतला आणि केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन केले. मॉक ड्रिलदरम्यान कुठल्याही प्रकारची अफवा पसरली नाही आणि नागरिकांनी प्रशासनाच्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद दिला.

मॉक ड्रिलच्या यशस्वी समारोपानंतर प्रांताधिकारी उर्मिला पाटील आणि तहसिलदार उमेश पाटील यांनी सांगितले की, हे मॉक ड्रिल केवळ आपत्कालीन परिस्थितीत आपली तयारी किती आहे, हे तपासण्यासाठी आयोजित करण्यात आले होते. कोणतीही खरी आपत्ती ओढवलेली नाही, याची नागरिकांनी नोंद घ्यावी. त्यांनी नागरिकांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

या महत्त्वपूर्ण मॉक ड्रिलच्या वेळी प्रांताधिकारी उर्मिला पाटील, नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव, तहसिलदार उमेश पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त मंदार जवळे, ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त दिनेश तायडे, सहायक आयुक्त सोनल काळे, ठाणे महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी, उपायुक्त प्रणाली घोंगे, मुख्य अग्निशमन नियंत्रण अधिकारी निलेश झलके, सहाय्यक पोलीस आयुक्त ममता डिसूझा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.पोळ, नायब तहसिलदार दिनेश पैठणकर यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

एकंदरीत, ऑपरेशन अभ्यास हे मॉक ड्रिल ठाणे शहरात अत्यंत यशस्वीरित्या पार पडले आणि यातून आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाची आणि नागरिकांची सज्जता प्रभावी असल्याचे दिसून आले. या संपूर्ण मॉक ड्रिल मध्ये महसूल, आरोग्य, पोलीस, नागरी संरक्षण दल, होमगार्ड, ठाणे महानगरपालिका, आपत्ती व्यवस्थापन, टीडीआरएफ चे जवान, अग्निशमन दल ,

### बेधडक

**अद्दल....!**

पाकचे शेपूट वाकडे
ते वाकडेच दिसत आहे,
युद्धविराम करूनही शस्त्रसंधी
चे उल्लंघन तो करत आहे..!

नांगी टाकल्याचे फक्त नाटक
युद्ध खुमखुमी अजूनही दिसत आहे,
म्हणूनच त्यांना कायमची अद्दल
घडवावी देशभर सूर उमटत आहे..!!



-प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४

दैनिक जय महाभारत संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com * टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अखेर ‘देवगिरी’ साखर कारखाना दसऱ्याला पुन्हा सुरू होणार

फुलंब्री / सुधाकर जेठे
(दै.महाभारत)

आ अनुराधा चव्हाण यांनी शनिवारी ऑरेंज फ्लॅग सभागृह फुलंब्री येथे पत्रकार परिषद घेऊन फुलंब्री येथील देवगिरी सहकारी साखर कारखान्यावर अशासकीय मंडळाची नियुक्ती केली असून, कारखान्याची पुनर्बांधणी करून यंदा ऑक्टोबर महिन्यात सुरू करणार आहे. त्या म्हणाल्या, ’देवगिरी सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम १९९२-९३मध्ये सुरू झाला होता. काही काळ सुरळीत चालला; मात्र कालांतराने कारखाना डबघाईस आला. २०१०-११मध्ये, म्हणजेच १४ वर्षांपूर्वी शेवटचा गळीत हंगाम झाला. त्यानंतर कारखान्याला घरघर लागली. कारखाना कर्जाच्या खाईत बुडाला.



कारखान्याकडे कारखाना परिसर, सावंगी, चौका या भागांत कारखान्याच्या मालकीची मालमत्ता होती, ती कारखान्याच्या मालकीची सावंगी येथे १५५ एकर जमीन होती.

त्यातली २३ एकर जमीन समृद्धी महामार्गात गेली. त्यातून कारखान्याला २७ कोटी रुपये मिळाले. त्यानंतर चौका घाटातील ४२ एकर जमीन विक्रीतून ७कोटी ४० लाख, सावंगी शिवारातील १३२ एकर जमीन विक्रीतून ८४ कोटी रुपये मिळाले. ही जमीन विकून कारखान्याकडे १२४ कोटी ६५ लाख रुपये मिळाले. सर्व कर्ज देणी करून कारखान्याकडे १३ कोटी ३९ लाख रुपये शिल्लक असून, या रकमेतून कारखाना सुरू करणार असून, तालुका व परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी केला जाणार आहे. तालुका व कारखाना कार्यक्षेत्रातील नवीन सभासद नोंदणी (शेअर्स) करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.देवगिरी कारखान्यावर अशासकीय सदस्य म्हणून कल्याण भिकाजी चव्हाण, नितीन (बंटी) शंकरराव देशमुख, योगेश मधुकर मिसाळ यांची नियुक्ती झाली आहे.

# भरपावसात डांबरीकरण- नागरिकांच्या सतर्कतेने काम थांबले

इचलकरंजी / संभाजी गुरव
(दै.महाभारत)

शहरातील जवाहरनगर परिसरात लोकल मार्टसमोर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ५२ कोटी रुपयांच्या कामातील रस्त्याचे काम सुरू होते,सदर रस्त्याचे कामांमध्ये भर पावसात डांबरीकरण करण्याचा प्रकार सुरू असल्याने भागातील नागरिकांनी इचलकरंजी नागरिक मंचकडे तक्रार केली व व्हिडिओ पाठवले,संबंधित व्हिडिओ इचलकरंजी नागरिक मंचद्वारे सोशल मीडियामध्ये प्रसारित करण्यात आले आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांना याबाबत माहिती देण्यात आली,त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकाऱ्यांनी तात्काळ काम थांबवण्याच्या सूचना दिल्या असून झालेले काम परत नव्याने



करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक विभागाचे अभियंती श्री सतीश शिंदे यांनी नागरिक मंचला दिली.शहरातील विविध प्रभागात ५२ कोटी रुपयांच्या कामांमध्ये मक्तेदारांच्याकडून हलगर्जीपणा होत असून शासनाच्या पैशाचा अपव्यय होत असल्यास नागरिकांनी त्वरित इचलकरंजी नागरिक मंचकडे तक्रार करावी असे नागरिक मंचच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधी यांनी मक्तेदाराणा याबाबत कडक सूचना कराव्यात अशीही मागणी नागरिकातुन

# साईनगरी साई कलारत्न समाज भूषण पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै.महाभारत)

संत साईबाबांच्या पवित्र नगरीत शिर्डी येथील हॉटेल शांतीकमल येथे ओम साई विकास प्रतिष्ठान आणि बी. बी.सी. फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार २०२५ सोहळा मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात संपन्न झाला आहे अशी माहिती साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार समिती संस्थापक सुदाम संसारे सर यांनी दिली आहे.

या भव्य सोहळ्यात पत्रकारिता, वारकरी संप्रदाय व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल वारकरी संप्रदायाचे स्टार प्रचारक व प्रसारक पत्रकार रामभाऊ आवारे सर,साई वात्सल्य सेवाभावी संस्थेच्या संस्थापिका रत्नाताई चांदगुडे पाटील, राष्ट्रीय स्केटींग क्रीडापटू कु दुर्गा गुंजाळ, पत्रकार सागर निकाळे, पत्रकार योगेश अडसरे, पत्रकार मुकुंद आव्हाड सारोळे थडी, यांना साई कलारत्न समाजभूषण पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते शाल, ट्रॉफी, सन्मानपत्र ,मेडल देऊन समारंभ पूर्वक सन्मानित करण्यात आले.हा प्रतिष्ठित पुरस्कार वितरण सोहळा शिर्डी येथील हॉटेल शांतीकमल येथे आयोजित करण्यात आला होता. ओम साई विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुदाम संसारे, प्रसिद्ध अभिनेत्री वंदना गव्हाणे, आणि प्रख्यात हॉटेल उद्योजक किशोर कालडा आदींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. या सोहळ्याला पुण्याचे दिग्दर्शक अल्ताफ शेख, प्रेम मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक सुदाम संसारे, आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते

यावेळी सुदाम संसारे सर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला सोहळ्याला विशेष आनंदाची भर पडली ती म्हणजे ओम साई विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि प्रेम



चित्रपटाचे दिग्दर्शक सुदाम संसारे यांच्या वाढदिवसाच्या उत्सवाने, उपस्थित मान्यवर आणि प्रेक्षकांनी त्यांना शुभेच्छा देत त्यांचा वाढदिवस थाटात साजरा केला. यावेळी सुदाम संसारे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, हा पुरस्कार सोहळा आणि वाढदिवसाचा आनंद त्यांच्यासाठी अविस्मरणीय आहे. मान्यवरांची उपस्थितीत सोहळ्याला किशोर कालडा (प्रसिद्ध हॉटेल व्यवसायिक आणि समाजसेवक, संगमनेर), अल्ताफ शेख (दिग्दर्शक, पुणे), वंदना गव्हाणे (अभिनेत्री), आणि इतर अनेक क्षेत्रांतील दिग्गज व्यक्ती उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीने या कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि ओम साई विकास प्रतिष्ठान आणि बी.बी. सी. फिल्म प्रोडक्शनच्या या उपक्रमाचे कौतुक केले. हॉटेल शांतीकमल, ओम साई विकास प्रतिष्ठान आणि बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त प्रयत्नांनी हा पुरस्कार राष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठेचा मानला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. शिर्डी ही संत साईबाबांची पवित्र भूमी असल्याने या ठिकाणी आयोजित हा पुरस्कार सोहळा सर्वांसाठी विशेष ठरला.साईबाबांच्या आशीर्वादाने हा सोहळा यशस्वी झाला असे आयोजकांनी सांगितले. सामाजिक, सांस्कृतिक आणि कला क्षेत्रातील योगदानाला प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो आणि यंदाही या सोहळ्याने सकारात्मक संदेश दिला हा पुरस्कार सोहळा सामाजिक आणि कला क्षेत्रातील कार्याला प्रोत्साहन देणारा आणि साईबाबांच्या विचारांना पुढे नेणारा ठरला. ओम साई विकास प्रतिष्ठान आणि बी.बी. सी. फिल्म प्रोडक्शन यांनी भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करून समाजातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन देण्याचे आश्वासन दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरिता परदेशी मॅडम यांनी केले

# भारतीय सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी कंधार मध्ये तिरंगा रॅली!

कंधार । धोंडीबा मुंडे
(दै.महाभारत)

श्रीनगर मध्ये पैलगाम येथे झालेला दहशतवादी हल्ला आणि शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली आणि भारतीय सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार कंधार शहरातील मुख्य रस्त्याने तिरंगा रॅली काढण्यात आली. पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भाने वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एड.बाळासाहेब आंबेडकर यांनी आपला वाढदिवस साजरा न करता पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध आणि भारत पाकिस्तान यांच्या मध्ये युद्धजन्य परिस्थिती तसेच शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली आणि भारतीय सैन्यांचे मनोबल वाढवण्यासाठी बाळासाहेबांनी आपला वाढदिवस साजरा न करण्याचे आवाहन केले होते.त्यामुळे महाराष्ट्रातील त्यांचे



कार्यकर्ते, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल आणि वंचित बहुजन आघाडी च्या वतीने त्यांचा वाढदिवस साजरा न करता संपूर्ण महाराष्ट्रात भारतीय सैन्यांचे मनोबल वाढवण्यासाठी तिरंगा रॅली काढण्याचे आव्हान केले होते.त्यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत दि.११ मे रोजी कंधार शहरामध्ये भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक ही तिरंगा रॅली भीमनगर कंधार येथून निघून कापड लाईन,छत्रपती शिवाजी महाराज चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मार्गे महाराणा प्रताप चौकातून परत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याकडे येऊन त्यांच्या पूर्णकृतीप्रिया पुष्पहार अर्पण करून राष्ट्रगीताने या रॅलीची सांगता झाली.

या रॅलीमध्ये भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक विलास कांबळे, तालुकाध्यक्ष जितेंद्र ढवळे, समता सैनिक दलाचे मेजर संजय सोनकांबळे,संरक्षण जिल्हा उपाध्यक्ष संतोष दुंडे,वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष संतोष गवारे,वंचित बहुजन आघाडी तालुका महासचिव रुपेश कांबळे,महिला तालुका अध्यक्षा साधना येंगडे, रमाताई कठारे, अनिता कदम, गंगासागर दिग्रसकर, कल्पना ढवळे वंचित बहुजन आघाडी ता. उपाध्यक्ष हमीद पठाण, वंचित बहुजन आघाडी ता.उपाध्यक्ष रानाप्रताप पवळे,भारतीय बौद्ध महासभेचे एन.एन. कांबळे, आर.एन. गायकवाड, सुदाम मोडके, सामाजिक कार्यकर्ते माधव कांबळे,समता सैनिक दलाचे विलास सोनकांबळे,पांडुरंग सोनकांबळे, विलास ढवळे , अमोल कांबळे,मधुकर सोनकांबळे, राजरत्न कांबळे, मनोहर शिंगारपुतळे यांच्यासह भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दल वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते पदाधिकारी आणि सर्वसामान्य जनतेने या तिरंगा रॅलीमध्ये सहभाग नोंदवून भारतीय सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी घोषणा देत रॅलीमध्ये सहभाग नोंदवला होता,

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने कंधार शहरांच्या मुख्य रस्त्याने तिरंगा ध्वज हातात घेऊन भारत माता की जय,वंदे मातरम,शहीद जवान अमर रहे,भारतीय संविधानाचा विजय असो,हम सब एक है!अशा घोषणा शहरांच्या मुख्य रस्त्याने तिरंगा रॅली काढण्यात आली.

# प्री वेंडीग की फ्री वेंडींग

विवाह करताना हौसेला मोल नसते हे आपण पाहतो. विवाह ,जन्म- मृत्यूनंतरच्या विधी , संस्कार, पद्धती, परंपरा यामध्ये बदल होत असल्याचे चित्र दिसून येते. संस्कारांमधील काही चालीरीतींना काही जनसमुदाय शेकडो वर्षांपासून चिकटून बसलेला आहे तर काही जाती धर्मांमध्ये बदल होताना ही पाहिले अनुभवले आहे. काळानरूप काही जाचक चालीरीती रुढी प्रथा आपण मागे सोडून द्यायलाच हव्यात, व चांगलं ते स्वीकारायला हवे. कारण सामाजिक दृष्ट्या ते सर्वांच्याच हिताचे आहे. जसे की मध्यंतरी जैन समाजाने एकत्रित येऊन खूप चांगला निर्णय घेतला तो म्हणजे जेवणातील मेनू हे थोडेच पण रुचकर ठेवायचे. अनेक अन्नपदार्थ ठेवून ते वाया जाण्यापेक्षा असे निर्णय घेतलेले कधीही स्वागताहार्यच आहेत.

कोरोना काळात तर आपण सर्वांनीच अनुभवले की जन्म मृत्यू तसेच विवाह याबाबत सर्व समाजाने चालीरीती परंपरांना फाटा देत विधी कसे पार पाडले ते ...कारण कोरोना काळाचा महिमाच तसा होता , परंतु लोकांनी यातून तात्पुरताच बोध घेतलेला दिसतो. पुन्हा अनावश्यक खर्च करत जन्मापासून मृत्यूपर्यंत तसेच विवाह पर्यंतचे सर्व विधी थाटामाटात साजरे होताना आपण पाहतो . मग प्रश्न पडतो तो निसर्गाने आपणास दिलेल्या संधीतून आपण काय शिकलो ?

होय आपण यातून काहीच बोध घेतला नाही असे म्हणावयास काहीच हरकत नाही, कारण मी ज्या विषयावर माझे मत आपणांसमोर मांडणार आहे त्यासाठी मी वरील मुद्दे मुद्दामच आपणांसमोर आधीच कथन केले. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या मुलीचा विवाह अत्यंत साधेपणाने पार पडला. मोजक्याच लोकांना बोलावून हा सोहळा सर्व विधी संस्कारांसहित पार पडला. हल्ली विवाह सोहळे खर्चिक व महागडे झाले आहेत. त्यातच प्री-वेडिंग शूट सारख्या नव्या महागड्या प्रथांची नको ती भुरळ तरुणाईला पडत चालली आहे. पूर्वी आनंदाचे, लग्नाचे क्षण फोटोच्या माध्यमातून आठवणीत राहायचे. प्रत्येक जण आपापली परिस्थिती पाहून किती फोटोंना प्राधान्य द्यायचे ते ठरवत. अलीकडे प्री-वेडिंग फोटोग्राफी ही नवीन संस्कृती तरुणांमध्ये फॅशन बनत चालली आहे. लग्न जमले की लग्ना आधीच विविध निसर्गरम्य ठिकाणी किंवा ऐतिहासिक गडकिल्ले मंदिरे येथे जाऊन प्री-वेडिंग फोटोशूट करायचे... मग खर्च कितीही आला तरी चालेल....मी तर ऐकलं काहीजण ५० हजारां पासून एक ते दोन लाखांपर्यंत खर्च फक्त प्री-वेडिंगसाठी करतात. हौसेला मोल नाही हे खरे आहे पण फोटोशूटसाठी वेगवेगळे ड्रेस, मेकअप केला जातो, पाच-सहा जणांची टीम त्यासाठी राबवत असते या सर्वांचा खर्च लाखोंच्या घरात जातो. वर या शूटिंगसाठी विविध ठिकाणी जाऊन बाहेरगावीही राहावे लागते त्यामध्ये काही अनुचित प्रकारही घडतात, प्री-वेडिंग फोटो वरून एकमेकांना ब्लॅकमेल करणे, शारीरिक व मानसिक अत्याचार करणे या सुधा घटना घडल्या आहेत. मग पैशांचा व वेळेचा अपव्य होणाऱ्या आर्थिक नुकसानास जबाबदार कोण? बर काही वेळा तर प्री-वेडिंगसाठी एवढा खर्च करूनही लग्न टिकतातच असेही नाही.

मग याला जबाबदार कोण ? तुम्ही - आम्ही, की मुलांच्या आग्रहाला बळी पडणारे पालक ? नको त्या पाश्चात्य संस्कृतीस बळी पडणारी आजची तरुणाई ?

शेतकरी आपल्या जमिनीचा पोत पाहूनच शेतात पिकांची निवड करतो त्याचप्रमाणे नवीन ट्रेंड आपण दुसऱ्या संस्कृती पासून घेतो तेव्हा तो ट्रेंड या समाज व्यवस्थेत रुजू होऊ शकतो का ? त्यांचे परीणाम दुषपरीणाम याचा विचार होणे आवश्यक आहे. प्री-वेडिंग शूट करताना आई-वडिलांनी कष्टाने कमावलेल्या पैशांचा चुराडा काही क्षणात करणाऱ्या तरुणाईला खरी पैशांची व नात्यांची किंमत कळणार तरी कधी ?

विवाहापूर्वी एकमेकांचे विचार जाणून घेणे गरजेचे आहे. एकमेकांना आपण पूरक आहोत का? एकमेकांच्या विचारांचा आपण आदर करणार आहोत का ? तसेच आपण एकमेकांसाठी काय काय ॲडजेस्टमेंट करु शकतो ते समजून घेणे गरजेचे असते. त्यासाठी मनमोकळ्या फ्री गप्पा बरोबरच कौटुंबिक संवाद झालाच पाहिजे. पूर्वी मुलाची कर्तबगारी नातेसंबंध पाहिले जात. पत्रिकेचे स्तोम व वाढीव अपेक्षा नव्हत्या तरीसुद्धा त्यांचे संसार यशस्वी झालेच की. विनाकारण पैशांची उधळपट्टी, दिखाऊपणासाठी केलेला डामडौल यासारख्या अनावश्यक खर्चात प्री-वेडिंग ही अजून एक भरच म्हणावी लागेल. भारतीय संविधानाने प्रत्येकाला स्वातंत्र्य दिले असले तरी स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे हे समजले पाहिजे. प्रत्येकाने आपले आचरण संस्कार जपायचे की पाश्चात्त्य संस्कृतीखाली विवाह पद्धतीचे किती विकृतीकरण करायचे याचा आजच्या प्रत्येक पालकांनी वधू-वरांनी आपली सदसद् विवेक बुद्धी जागृत ठेवून अवश्य विचार करावा. प्री-वेडिंग पेक्षा नात्यांमध्ये फ्री वेडिंग व वेल्डिंग करून विवाह संस्कार समृद्ध करावा. त्यासाठी घरातूनच पालकांनीही आपल्या मुलांचे समुपदेशन करणे गरजेचे आहे. मी माझे मत मांडले शेवटी काय कोणी किती व कसा खर्च करायचा हे ज्याचे त्यानीं ठरवावे... रतन टाटांनी लंडनला व्याख्यानात सांगितलेले सुंदर विचार ते म्हणजे ....श्रीमंत होण्यासाठी तुमच्या मुलांना शिकवू नका. त्यांना आनंदी राहण्यासाठी शिकवा, ज्यामुळे मोठे झाल्यावर त्यांना वस्तूंचे व वेळेचे महत्व आणि मूल्य कळेल ...किंमत नाही.

**सौ. सुरक्षा साखरे**
जोडी जमली वधुवर सूचक मंडळ,
९२७०५७८७९६

# आमदार ताई आपल्या साक्री मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे कधी करणार?

## कांदा शेतात चिखल झाला, फळबागा उध्वस्त झाल्या, लोकप्रतिनिधींसह अधिकारी चे दुर्लक्ष? शेतकऱ्यांचा आरोप

धुळे / उमाकांत अहिरराव
(दै.महाभारत)

साक्री तालुक्यातील गेल्या तीन ते चार दिवसापासून सोळा गाव काटवान, माळमाथा, पश्चिम पट्ट्यात जोरदार पावसासह गारपीट वादळी वारा सुरू, शेतकऱ्यांचा शेतात पडलेला कांदा, मका, फळबागा पूर्णतः उध्वस्त झाले आहेत. बहुतांश शेतकऱ्यांचा गुरांसाठी साठवलेला चाराही पूर्णतः पावसात ओलाचिंब झाला. मात्र बहुतांश ठिकाणी अद्यापही लोकप्रतिनिधींसह अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर अद्यापही गेलेले नाहीत. बळीराजा आस लागून आहे फडणवीस, शिंदे, पवार सरकारकडे मदत मिळेल या आशेने, परंतु शेतकऱ्यांच्या बांधावर अद्यापही तहसीलदार कृषी अधिकारी पंचनामे करण्यासाठी गेलेले नाही. तालुक्याचे



लोकप्रतिनिधी लग्नाच्या कामातच व्यस्त बघावसं मिळत आहेत. शेतात पडलेला कांदा देखील पूर्ण चिखल झाला डाळिंब पपईच्या फळबागांना देखील अचानक आलेल्या पावसाचा मोठा फटका बसला आहे. आधीच डोक्यावर कर्जाचा डोंगर असलेल्या बळीराजा पूर्णतः खचला असून मायबाप सरकारकडे आस लागून आहे पण मायबाप सरकार इथे पंचनामे करण्यासाठी वेळ नाही तर नुकसान भरपाई ची मदत कधी मिळेल, असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांना पडला आहे. तालुक्याचे लोकप्रिय आमदार गावित यांनी स्वतः लक्ष घालून नुकसानग्रस्त भागाची पाहणी करत तात्काळ पंचनामा करण्याचे आदेश द्यावेत अशी आशा व्यक्त केली आहे शेतकऱ्यांनी.

# युवा शेतकऱ्यांच्या प्रयत्नातून तयार झाली केशर आंब्याची फळबाग

ब्रम्हपुरी/प्रतिनिधी
(दै.महाभारत)

जिल्ह्यातील प्रगतीशील आणि युवा शेतकऱ्यांचा प्रायोगिक शेती करण्याकडे कल वाढत असताना मात्र ब्रम्हपुरी तालुक्यामध्ये अनेक शेतकरी आजही पारंपरिक शेतीच शेतकरी करीत आहे. जिल्ह्यात फळबागेसाठी पोषण वातावरण नाही, तरीही ब्रम्हपुरी पासून ३किमी अंतरावर असलेल्या दुधवाही येथील युवा शेतकरी प्रवीण मेश्राम या शेतकऱ्याने २०२१ मध्ये भाऊसाहेब फुंडकर योजनेमार्फत प्रामुख्याने केशर आंब्याची ३०० झाडे, मोसंबी, कागदी लिंबू, चिकू, फणस, तायवान पेरू सोबत विविध फळांची लागवड केली आहे. सध्या बाजारात आंब्याला चांगला दर असून, आंब्याच्या विक्रीतून ब्रम्हपुरी तसेच अन्य परिसरातील शेतकरी, आणि ग्राहक पाहण्याकरिता येऊन केशर आंबा प्रति किलो १५० रुपयांनी खरेदी करीत आहेत.

जिल्ह्यात खरीप हंगामात धान, सोयाबीन या पिकांचेच अधिक क्षेत्र पीक लाळगडीखाली असते. याशिवाय तूर, उडीद, मूग, ज्वारीची लावगड शेतकरी करतात. तसेच रब्बी हंगामात कडधान्य पिकांसह हरभरा, गहू, मका व तेलवर्गीय पिकांची लावगड शेतकरी करीत असतात. ही पिके हंगामी आहेत. जिल्ह्यात फळपीक लावगडीसाठी अद्यापतरी शेतकरी वळले नसल्याचे दिसते.

यापुढे सिंचन क्षेत्र वाढल्यास मोठ्या प्रमाणात शेतकरी फळबाग लागवट करू शकतात.फळबाग योजनेतून अनुदान भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये अनुदान मिळाले, शिवाय फळबागेकरीता लागनारे पाणी नियोजन करण्याकरिता ठिंबक सिंचना करिता सुद्धा शासनाकडून अनुदान प्राप्त केले आहे . युवा शेतकरी प्रविण मेश्राम यांनी शेतात फळबाग सोबत जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन आणि मत्स्य व्यवसाय पण सुरू केला आहे अशी माहिती फळबाग शेतकरी प्रविण मेश्राम यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना माहिती दिली.

# दहावीचे विद्यार्थी आणि पालकांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान

इचलकरंजी / संभाजी गुरव
(दै.महाभारत)

आजच्या स्पर्धात्मक युगात दहावीचे सर्व विद्यार्थी आणि पालकांसमोर, पुढे काय करायचे याबाबत अनेक प्रश्न समोर उभे असतात. यावर विशेष मार्गदर्शन करण्यासाठी प्रसिद्ध करिअर समुपदेशक, वक्ते आणि लेखक विवेक वेलणकर, पुणे यांचे ’दहावीनंतर करिअर निवडताना...’ हे माहितीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल यांच्या वतीने हा उपक्रम आयोजित केला असून मंगळवार दिनांक १३ मे रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता श्रीमंत घोरपडे नाट्यगृह, इचलकरंजी येथे व्याख्यान होणार आहे.इयत्ता दहावीची परीक्षा दिलेले सर्व विद्यार्थी आणि आता दहावीस गेलेले विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांसाठी सदरचे व्याख्यान उपयुक्त असून यासाठी प्रवेश विनामूल्य आहे. तरी संबंधित विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्रृंगऋषीगडाचा नारळी सप्ताह १२ मे रोजी सांगता होणार

तिंतरवणी / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

सुप्रसिद्ध श्रृंगऋषीगडाचे पहिले नारळी सप्ताहाचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे आडगाव (ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) ग्रामस्थानी उचलले आहे. श्री क्षेत्र श्रृंगऋषीगडाचे मठाधिपती गुरुवर्य महंत सुरेशानंद महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते गुरुवारी दि.५ में से १२ ने सप्ताहाचा आयोजन करण्यात आले होते. फूले टाकून ५ में सोमवारी

प्रारंभ करण्यात आला . महत सुरेशानंदजी महाराज यानी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपूर्ण उपक्रमाचे पहिलेच वर्ष असुन श्री क्षेत्र आडगाव या ठिकाणी सुरू केला. या पुढे सप्ताहाची परपरा सुरू ठेवणार आहे असे महंत सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांनी सांगितले. ह.भ.प महंत तुकाराम महाराज रुपनर वैकुंठगमनानंतर त्याची परंपरा विद्यमान मठाधिपती महत सुरेशानंदजी महाराज शास्त्री याच्या मार्गदर्शनाखाली अनेक सप्ताहाचे आयोजन चालु आहे. या नारळी सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण होणार असुन आदर्श सप्ताह कसा असतो त्याचे उदाहरण या सप्ताहातुन दिसणार आहे हा नारळी सप्ताहाला महाराष्ट्रातून लाखो भाविकांची उपस्थिती असणार आहे. ५ में से १२ मे हा या महोत्सवाचा

कालावधी असून सप्ताहामध्ये दररोज दुपारी ३:३० ते ६ या वेळेमध्ये अक्षय महाराज पिंगळे यांची श्रीमद् भागवत कथा संपन्न होणार आहे. सप्ताहामध्ये अनुक्रमे विलास महाराज गेजगे (गंगाखेड), विशाल महाराज खोले (मुक्ताईनगर), बाळु महाराज गिरगावकर (सेलू), समाधन महाराज शर्मा (केज), स्वामी जनार्दन महाराज (मच्छिंद्रगड), शिवा महाराज बावस्कर (खानदेश) ज्ञानेश्वर महाराज कदम आळंदी) याचे कीर्तन होणार आहे.

सप्ताहाच्या आठव्या दिवशी मठाधिपती




महत सुरेशानंदजी महाराज शास्त्री वाचे जाहीर काल्याचे हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल, सप्ताहामध्ये परपरेप्रमाणे दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ हे कार्यक्रम होणार संपन्न होत आहे

# देवगावला ३१ वर्षीय तरुणाची आत्महत्या

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै.महाभारत)

निफाड तालुक्यातील देवगाव येथील ३१ वर्षीय तरुणाने घराच्या छताला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना बुधवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. जनार्दन गोविंद सोनवणे (वय ३१) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.



सोनवणे हे आपल्या आई-वडिलांसोबत देवगाव येथे राहत होते. ते कुटुंबाचा आधार होते. पहाटे सुमारे ४.३० वाजेच्या सुमारास त्यांनी राहत्या घराच्या छताला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब घरच्यांच्या लक्षात येताच एकच खळबळ उडाली. तात्काळ शेजारी आणि पोलीस पाटील सुनिल बोचरे यांना याची माहिती देण्यात आली. त्यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात याची खबर दिली.घटनेची माहिती मिळताच लासलगाव पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक औदुबर मुरडनर यांनी घटनास्थळी धाव घेतली. शवविच्छेदनासाठी मृतदेह लासलगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.दरम्यान, आत्महत्येचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नसून, कुटुंबीयांचा जबाब नोंदवण्यात येणार आहे. स्थानिकांमध्ये या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे. जनार्दन हे शांत स्वभावाचे, कष्टाळू व्यक्तिमत्त्व म्हणून गावात ओळखले जात होते. त्यांचं अचानक असं जाणं अनेक प्रश्न निर्माण करत आहे.

गावात आत्महत्येच्या वाढत्या घटनांमुळे मानसिक आरोग्याच्या प्रश्नांकडेही लक्ष वेधले जात आहे. तरुणांमध्ये नैराश्य, बेरोजगारी, सामाजिक दबाव यांसारख्या अनेक गोष्टी आत्महत्येस कारणीभूत ठरत आहेत. त्यामुळे शासन आणि प्रशासनाने गावपातळीवर मानसिक आरोग्यविषयक जनजागृती मोहीम राबविण्याची गरज स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

# सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी वंचितच्या वतीने गेवराई शहरात तिरंगा रॅली संपन्न

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

दि. ११ मे रोजी वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने श्रध्येय बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त भारत-पाक युद्धजन्य परिस्थीतीत भारतीय सैनिकांचे मनोधैर्य उंचाविण्यासाठी गेवराई शहरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या अदेशावरुन आज दि. ११ मे रोजी संपूर्ण राज्यभर तिरंगा रॅली काढण्याचे निर्देश देण्यात आले होते, त्यानुसार वंचित बहुजन आघाडी तक्रार निवारण समितिचे राज्याध्यक्ष मा. विष्णु जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गेवराई तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड व बीड जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ पोकळे यांच्या नेतृत्वाखाली गेवराई शहरात मोटारसायकलवरून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली होती, यावेळी जय भारत, जय जवन जय किसान या घोषणांनी अक्षरशः गेवराई शहर दणाणून गेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात संविधानाच्या प्रस्तावनेला पुष्पहार अर्पण करून रॅलीला सुरुवात करुन शास्त्री चौक येथे लालबहादूर



शास्त्री यांना पुष्पहार अर्पण करून, शहिद जवानांना श्रध्दांजली अर्पण करून रॅलिचा समारोप केला यावेळी किशोर भोले, अर्जून सुतार, अमोल सुतार, ॲड. सोमेश्वर कारके, ज्ञानेश्वर हवाले, भारत हवाले,प्रकाश भोले, छगण खरात, माणिक राठोड, किशोर चव्हाण,बप्पासाहेब काळे, शिवाजी केदार, विकास गायकवाड, प्रशांत केदार,सुनिल चव्हाण, नितिन खापरे, देवेंद्र धुरंधरे, कृष्णा हतागळे, साईनाथ सुतार, सतिष नाडे, सिध्दार्थ शेजुळ, महादेव निकाळजे, सतिश निकाळजे, अंकुश बनसोडे, संतोष पवार, कैलास बनसोडे, अतुल हतागळे, चरणदास हतागळे, अमोल पवार यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# माकपच्या आंदोलनाच्या दबाववानंतर वीज वितरण कंपनीवर कारवाई

माहूर (दै.महाभारत)

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या (माकप) निवेदनानतर नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अनियमित कारभाराची गंभीर दखल घेतली आहे. वीजपुरवठ्यातील वारंवार खंड,अधिकारी - कर्मचारी यांच्या मार्फत ग्राहकांना व सामान्य नागरिकांना प्रतिसाद न देणे, मोबाईल फोन बंद करून ठेवणे किंवा फोन न घेणे,अवाजवी बिलिंग, सतत होत असलेली वीज खंडित समस्या आणि ग्राहक तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत माकपचे सचिव कॉ.गंगाधर गायकवाड यांनी दि.९ मे रोजी निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला होता.१० मे रोजी जिल्हाधिकारी यांनी आपल्या कक्षात महावितरणची आढावा बैठक घेतली.माकपच्या तालुका समितीने गेल्या आठवड्यात माध्यमातून निवेदन सादर करून नांदेड



शहर आणि ग्रामीण भागातील वीज समस्यांवर त्वरित कारवाईची मागणी केली होती. शहरामध्ये तासन्तास वीजपुरवठा खंडित होतो, जादा बिले येत आहेत. वीज कंपनीचा ढिसाळ कारभार सहन केला जाणार नाही, वीज वितरण कंपनी विरोधात तीव्र आंदोलन करणार असे माकपचे कॉ.गायकवाड यांनी सांगितले होते.जिल्हाधिकाऱ्यांनी या निवेदनाची तातडीने दखल घेत वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे. तसेच वीजपुरवठ्याच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठक बोलावण्यात आली.स्थानिक नागरिकांनी माकपच्या पुढाकाराचे स्वागत केले असून, वीज समस्यांमुळे हैराण झालेल्या नागरिकांमध्ये संताप आहे. रोज वीज जाते, बिल मात्र दुप्पट येते. आता कामचुकार अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाईची गरज आहे,असे नांदेडमधील रहिवासी बोलून दाखवत आहेत.

वीज कंपनीने दिलेली प्रतिक्रिया ही पटण्यासारखी नसून उन्हाच्या उकड्यात परेशान असलेल्या नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. वीज कंपनीच्या सूत्रांनुसार, कंपनी तांत्रिक अडचणी आणि देखभाल कार्यामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचे सांगत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी वीज कंपनीच्या सर्वच जबाबदार अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन गंभीर सूचना केल्यामुळे नागरिकांना लवकरच दिलासा मिळेल अशी अपेक्षा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने व्यक्त केली आहे.पुढील आठ दिवसात सुधारणा झाली नाही तर वीज वितरण कंपनीच्या कामचुकार आणि दोषीं अधिकारी - कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालया समोर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा लेखी इशारा

# जिल्हा सत्र न्यायालया च्या निवृत लिपिका ची निर्घृण हत्या मुंडके नसलेल्या अवस्थेत विहिरित आढळला मृतदेह घटनेने खळबळ!

वाळूज / पांडुरंग गायकवाड
(दै.महाभारत)

पैठण तालुक्यातील चिंचाळा गावच्या परिसरात गट क्र१२१ शिवारात जिल्हा न्यायालयाच्या निवृत्त लिपिका ची निर्घुन हत्या झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे नामदेव एकनाथराव ब्रह्मराक्षस वय वर्ष ६५ अंदाजे असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मुंडकं छाटून त्यांचा मृतदेह विहिरीत फेकून दिला होता. पण काही वेळाने त्यांचा मृतदेह पाण्यात तरंगू लागल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

अधिक माहितीनुसार, नामदेव ब्रह्मराक्षस हे गेवराई न्यायालयात लिपीक म्हणून नोकरीस होते. अलीकडेच ते सेवेतून निवृत्त झाले होते. त्यांची पैठण शिवारात शेत जमीन होती. शेतात घर बांधण्याच्या इराद्याने ते पत्नी समवेत मंगळवारी छत्रपती संभाजीनगर हुन आपल्या मुळ गावी भावाकडे आले होते. दोन दिवस त्यांनी घर बांधण्याची जागा निश्चित करून परत छत्रपती संभाजीनगरला जाण्याचा बेत आखला होता.मात्र शुक्रवारी पहाटे तीन वाजताच्या सुमारास ते बेपत्ता झाले होते. सकाळी भाऊ आणि त्यांची पत्नी झोपेतून उठल्यानंतर त्यांना नामदेव ब्रह्मराक्षस बेपत्ता असल्याचे समजले. यानंतर त्यांनी तातडीने आपल्या भावाचा शोध घ्यायला सुरुवात केली. यावेळी त्यांच्या स्वतःच्या शेतातील विहिरीत मुंडके नसलेल्या अवस्थेत नामदेव यांचा मृतदेह पाण्यावर तरंगत असल्याचे आढळले.



त्यानंतर या घटनेची माहिती पाचोड पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन ग्रामस्थांच्या मदतीने मुंडके नसलेला मृतदेह विहीरीबाहेर काढला. नामदेव यांची हत्या कुणी आणि कशासाठी केली? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. या घटनेचा पोलीस कसून तपास करत आहेत. वरील प्रकरणांमध्ये संशयाची सुई कुणाकडे जात आहे याचा थांग पत्ता सध्या तरी लागत नाही सदरील प्रकरण तपास अधिकारी कोणत्या पद्धतीने उघडकीस आनतिल याकडे परिसरातील नागरिकांची व कुटुंबाचे लक्ष लागले आहे मयत नामदेव ब्रह्मराक्षस यांच्या नातवाचे लग्न अवघ्या काही दिवसा वरती येऊन ठेपले होते.

# सिडकोत अल्पवयीन टवाळखोरांचा धिंगाणा,स्वामी समर्थनगरात धारदार शस्त्राने कारच्या फोडल्या काचा

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै.महाभारत)

नाशिक-: सिडको परिसरात आठवडाभरापासून सातत्याने अल्पवयीन टवाळखोरांचा धिंगाणा सुरू असून अंधाराचा फायदा घेत दगडफेक करणे, जोरात आरडाओरडा करणे, व्यावसायिकांना धमकावणे, दुकानांवर दगडफेक करणे आदी प्रकार घडत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. अशातच स्वामी समर्थनगर भागात मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात टवाळांनी धिंगाणा घालत धारदार शस्त्राने कारची काच फोडल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी अंबड पोलिस तपास करत आहेत.

सेंट लॉरेन्स हायस्कूल समोरील स्वामी समर्थनगर भागात संभाजी कडवे यांनी आपली कार (एमएच १५ बी डी ३०७५) घराजवळ उभी केलेली होती. मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी धिंगाणा घालत वीज गायब असल्याचा फायदा घेत या वाहनाच्या दोन्ही काचा धारदार शस्त्राने फोडत दहशत माजवली. याप्रकरणी अंबड पोलिसांत नोंद करण्यात आली असून, पोलिसांचे पथक पुढील तपास अंबड पोलीस करत आहे






# आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

जालना /प्रतिनिधी
(दै.महाभारत)

वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त युवा सेना जालना व फ्लेक्स हेल्थ केअर सेंटर यांच्या संयुक्त वित्ताने भव्य निशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अश्विन अंबेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना अंबेकर म्हणाले की युवा सेनेच्या माध्यमातून नेहमीच सामाजिक कार्याला महत्व देण्यात आले आहे व राजू वैद्य यांच्या माध्यमातून आतापर्यंत हजारो गरजू लोकांची सेवा करण्यात आलेली आहे. सदरील आरोग्य तपासणी शिबिराचा जालना शहरातील दीडशे रुग्णांनी लाभ घेतला.यावेळी डॉ. पवन कुलथे यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना योग्य मार्गदर्शन केले यावेळी सुरेश सारडा राजू वैद्य दर्शन चौधरी यांच्यासह युवा सेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# बुद्ध जयंतीनिमित्त परळीत भव्य धम्म रॅली धम्मदेसनेचे आयोजन

## सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - हनुमंत वाघमारे यांचे आवाहन



परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त १२ मे २०२५ रोजी बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ शहरात भव्य धम्म रॅली आणि धम्मदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत असून, परळी शहरासह तालुक्यातील सर्व बौद्ध बांधवांनी आणि धम्मप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष आयु. हनुमंत वाघमारे यांनी केले आहे.

या दिवशी सायंकाळी ६ वाजता राणी लक्ष्मीबाई टॉवर येथून भव्य धम्म रॅलीला प्रारंभ होणार असून ती मोंढा मार्केट मार्गे पुढे जाऊन परळी शहरातील रेल्वे स्थानक परिसरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापाशी समाप्त होणार आहे. रॅली दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान बुद्ध यांचे संदेश देणारे फलक, धम्मचक्र ध्वज आणि अनुयायांची शिस्तबद्ध उपस्थिती या रॅलीला विशेष आकर्षण देणार आहे.

रॅलीच्या समारोपानंतर रेल्वे स्थानक येथील मोठ्या मैदानावर धम्मदेशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात पूज्य भिक्खु रेवतबोधी यांचे धम्मदेशना होणार असून ते भगवान बुद्धांच्या करुणा, अहिंसा आणि समता या तत्वांवर आधारित मार्गदर्शन करतील. त्यांच्या धम्मदेशनातून समाजप्रबोधनास चालना मिळेल आणि युवकांमध्ये नैतिकतेचे भान जागृत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या निमित्ताने संपूर्ण परळी शहरात बुद्धमय वातावरण निर्माण होणार असून, बौद्ध बांधवांसाठी ही एक ऐतिहासिक आणि प्रेरणादायी संधी आहे. धम्म रॅली व धम्मदेशन कार्यक्रम शांततेच्या वातावरणात पार पडावा आणि समाजात एकोपा व बंधुभाव वाढावा, यासाठी आयोजकांकडून सर्व स्तरातील नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे परळी तालुकाध्यक्ष आयु. हनुमंत वाघमारे यांनी केले आहे.

# ईलेक्ट्रॉनिक बस प्रवासा पासून दिव्यांग प्रवाशी वंचित

## रापमचा तूघलकी कारभाराकडे बच्चूभाऊ कडू यांनी लक्ष देण्याची गरज

मानवत / अनिल चव्हाण
(दै.महाभारत)

बीड आगाराची महा, २३ ए,यू, क्र. ६५०१ ही इलेक्ट्रॉनिक बस आज मानवत बसस्थानकात आली. पण या बस सेवेचा लाभ मात्र दिव्यांग व्यक्तींना न झाल्यामूळे दिव्यांग व्यक्तीची हेळसांड झाली. अद्यावत व अधूनिक बसचा लाभ दिव्यांगांना व्हावा अशी मागणी विविध योजनेतील लाभार्थ्या मधून होत आहे.

बच्चूभाऊ कडू यांनी दिव्यांगाच्या योजनेकडे अधिक लक्ष देऊन दिव्यांगांना लाभापासून वंचित ठेवणार्याची चौकशी करावी व बीड आगार प्रमूखांना सूचना द्याव्यात अशी मागणी होत आहे.रापम ने आपल्या ताफ्यात अनेक बसेस दाखल केल्या असून या मध्ये विविध योजनैचे प्रवाशी प्रवास करतात पण नविन दाखल झालेल्या ईलेक्टॉनिक बसच्या प्रवासा पासून दिव्यांगासह अनेक लाभार्थी वंचित राहत असल्यामूळे वाहकांना आगार प्रमूखांनी लाभार्थी वंचित राहू नये या बस सेवेचा लाभ सर्वांनाच व्हावा या साठी सूचना कराव्यात अशी मागणी होत आहे.



दवाखान्याच्या कामासाठी नांदेड ला जाणार्या दिव्यांग व्यक्तिला वाहकाने नाकारल्याने या सेवे पासून दिव्यांग व्यक्ती वंचित राहत आहे. बच्चूभाऊ कडू यांनी लक्ष देऊन राज्यातील सर्व आगार प्रमूखांना सूचना कराव्यात अशी मागणी दिव्यांगातून होत आहे.

# गाळ माफियांनी केला धुनकवाड येथील माजी उपसरपंचावर हल्ला

## दहा दिवस लोटले तरी आरोपी मात्र मोकाटच

प्रतिनिधी / दत्ता कराड (दै.महाभारत)

धारुर तालुक्यातील धुनकवाड येथे माजी उपसरपंचावर गाळ माफिया व गावगुंडांनी जिवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला करून हात व करंगळी फ्रॅक्चर करून गंभीर दुखापत केली आहे.असुन या आधी ही या गावगुंडावर ३०२ व इतर मारहाणी सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.त्यांच्या विरोधात धारुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन हा गुन्हा दाखल होऊन दहा दिवसांचा कालावधी लोटला तरी सुद्धा आरोपी मोकाटच असुन पोलिसांचे या आरोपींकडे कानाडोळा आहे. तरी हे आरोपी गावातच खुले आम फिरताना दिसत आहेत.दि.३०/४/२०२५ रोजी दत्ता भिमराव यादव यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांना धुनकवाड येथील कुंडलीका धरणातील अवैध गाळ उपसा बंद करा म्हणून निवेदन दिले होते. हा राग मनात धरून गाळ माफिया व गावगुंडांनी माजी उपसरपंच वर हल्ला केला. दि.०२/०५/२०२५ रोजी माजी उपसरपंच दत्ता भिमराव यादव हे धारुर येथे आठवडी बाजार करिता मोटार सायकल वरुन जात असतांना दुपारी ३ वाजणेच्या सुमारास धुनकवाड फाटा येथे आले असता तेथे त्यांच्याच भावकीतील दत्ता छत्रभुज यादव तिथे उभा होते त्याने मला जुने भांडणावरुन शिवीगाळ केली. परंतु मी



त्यास न बोलता धारुर येथे आलो. आठवडी बाजार करुन धारुर येथुन गावी धुनकवाड येथे जात असतांना धुनकवड फाट्याजवळ रात्री ८ वाजण्याच्या सुमारास गावातील गावगुंड दत्ता छत्रभुज यादव हा तीथे उभा होता. त्याने माझे गाडीला हात करून थांबवले. त्यास काय झाले असे विचारले असता त्याने मला तु आता पटांगणामध्ये आला आहेस तु मागिल भांडणात चुकुन राहीला होतास तुला आता सुट्टीच नाही असे म्हणुन त्याचे जवळ ठेवलेला लोखंडी गज हातात घेऊन डाव्या हातावर मारुन मनगट व करगंळी फॅक्चर करुन गंभीर जखमी केले. त्यानंतर आमच्या गावातील गोरख गोविंदराव यादव, पाराराम गोंविदराव यादव, छत्रगुण गोविंदराव यादव, रामेश्वर छत्रगुण छत्रगुण यादव, गोवर्धन गोरख यादव,वचिष्ठ गोरख यादव, रामा विठ्ठल मस्के यांना फोन करुन बोलावुन घेतले. त्या सर्वांनी मिळुन लाथाबुक्याने मारहाण केली व गोरख गोविंदराव यादव यांनी त्यांना काठीने डाव्या हातावर मारुन मुक्कामार दिला.यानंतर त्यांचे चुलत भाऊ दत्ता सुर्यकांत यादव व नवनाथ शिवहार यादव यांना फोनकरुन बोलावुन घेतले. त्यांनी आमचे भांडणाची सोडवा सोडव केली. त्यानंतर माझे चुलत भाऊ यांनी मला धारुर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी घेऊन आले. परंतु हाताला मार लागला असल्याने त्यांना उपचारासाठी धारुर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवले व तेथील डॉक्टरांनी त्यांच्यावर प्रथमोपचार करुन पुढील इलाजाकरिता स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाई येथे पाठवले. तेथे उपचार घेऊन आल्यानंतर धारुर पोलिस ठाण्यात येऊन दत्ता भिमराव यादव यांना मारहाण करणारे धुनकवाड येथील गाळ माफिया व गावगुंड दत्ता छत्रभुज यादव, गोरख गोविंदराव यादव, पाराराम गोंविदराव यादव, छत्रगुण गोविंदराव यादव, रामेश्वर छत्रगुण यादव, गोवर्धन गोरख यादव,वचिष्ठ गोरख यादव, रामा विठ्ठल मस्के यांच्या विरुद्ध तक्रार दाखल करुन भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ नुसार कलम ११८(२),११८(१),११५(२), १९१(२),१९१(३),१९०,३५१(२),३५१(३) आदि कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला , असून आरोपी अद्यापही मोकाटच असुन गावात खुलेआम फिरत आहेत.तरी याकडे पोलिसांचा मात्र कानडोळा असल्याचे दिसत आहे.

# चालू बसमध्ये कंडक्टरला आला झटका

## परळीकरांनी घडविले माणूसकीचे दर्शन

परळी / विकास वाघमारे (दै.महाभारत)

रस्त्यावर वेगाने धावणाऱ्या एस. टी. बसमध्ये अचानक कंडक्टरला सौम्य हृदयविकाराचा झटका आला आणि तात्काळ प्रसंगावधान राखून ड्रायव्हरने गाडी थांबविल्याची घटना परळीत आज दिनांक ११ मे रोजी घडली . या घटनेची माहिती मिळताच आजूबाजूला असणाऱ्या परळीकरांनी मदतीसाठी धाव घेऊन माणुसकीचे दर्शन घडविले.

याबाबत अधिक माहिती अशी की,आज दिनांक ११ मे रोजी दुपारी पावणे बाराच्या सुमारास परभणी - लातूर चक२०ऋछ ३५१३ ही परभणी डेपोची एस. टी. बस परळी बस स्थानकातून लातूरच्या दिशेने निघाली. ही बस छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या पुढे येताच बसचे कंडक्टर कुंभार यांना अचानक हृदयाचा त्रास सुरू झाला. त्यामुळे तात्काळ बस चालकांनी गाडी रस्त्याच्या कडेला घेऊन उभी केली. त्यानंतर कंडक्टर कुंभार यांना खाली उतरवून बाजूलाच असलेल्या झाडाच्या सावलीखाली झोपविण्यात आले. व त्यांना हवा घालण्यात आली. तोपर्यंत आजूबाजूला असलेल्या परळीतील नागरिकांनी कुंभार यांच्याकडे धाव घेतली व त्यांना तात्काळ




दवाखान्यात नेण्यासाठी प्रयत्न करू लागले.परंतू कुंभार यांच्याकडे असलेल्या गोळ्या त्यांनी खालल्या.

. कुंभार यांना थोडे बरे वाटल्यानंतर परळीकरांनी ड्रायव्हर आणि कंडक्टर यांना चहा, पाणी पाजून पुन्हा बस मध्ये बसवून सदर बस परळी डेपोकडे वाटे लावली.परळी डेपोतील वाहतुक निरिक्षक कपिल चिंदालीया व वाहतूक नियंत्रक राठोड यांनी त्यांना दवाखान्यात नेले.कुंभार यांनी उपचार घेतल्यानंतर ड्रायव्हर व कंडक्टर दोघांनाही आरामासाठी थांबवून घेतले आहे.निश्चितच परळीकर नेहमीच संकटकाळी मदतीला धावतात हे घटनेने दाखवून दिले आहे.

# जागतिक परिचारिका दिनाच्या सर्व नर्सेसना मन:पूर्वक शुभेच्छा

सन १८५४ साली झालेल्या क्रिमिलियन युद्धातील जखमी सैनिकावर हातात दिवा घेऊन रात्री निस्वार्थीपणाने उपचार करणाऱ्या फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या सत्कार्याचा गौरव म्हणून त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ हा दिवस म्हणजेच त्यांचा जन्मदिवस १२ मे हा जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. १२ मे १८२० साली जन्म घेतलेल्या फ्लॉरेन्स नाइटिंगेल या आधुनिक शुश्रूषा शास्त्राच्या जनक- संस्थापिका होत्याहा दिवस आरोग्यसेवा क्षेत्रातील परिचारिकांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी तसेच रुग्णसेवेच्या सत्कार्याचा सन्मान होऊन इतरांना त्यापासून प्रेरणा मिळण्यासाठी साजरा केला जातो. आरोग्य सेवा आणि या प्रणालीचा मजबूत कणखर कणा म्हणजे परिचारिका

इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ नर्सेस यांनी आमच्या परिचारिका आमचे भविष्य परिचारिकांची काळजी घेणे म्हणजे अर्थव्यवस्था मजबूत करणे ही थीम सन २०२५ साठी जागतिक परिचारिका दिनासाठी दिली आहे. एक नर्स म्हणून आम्हाला या कार्याचा आम्हाला अभिमान, स्वाभिमान, आणि गर्व आहे, कारण तळागाळातील एक सामान्य माणूस ते अधिकारी पदाधिकारी पासून देशाचे सर्वोच्च स्थान भूषवणारे कोणतेही व्यक्तिमत्व असो त्यांना लसीकरण करणारी एकमेव व्यक्ती आहे ती म्हणजे नर्स

देवी सारख्या आजाराचे समूळ उच्चाटन असो पोलिओला देशातून हद्दपार करणे असो किंवा कोविड सारख्या जागतिक महामारी पेशंटची काळजी घेणारी व्यक्ती आणि या कोविड मधून नागरिकांना सुरक्षित ठेवण्यासाठी लसीकरण करणारी व्यक्ती म्हणजे नर्स. पण याच देवदूतांच्या कार्याचा विसर आज समाज- शासन- प्रशासन यांना पडला आहे त्यामुळे खालील मुद्द्यावर विचार होणे अपेक्षित आहे

१. २४ह्व७ कामाची बांधिलकी - यातून जिल्हा परिषद अंतर्गत नर्सेसना स्वत:साठी कुटुंबासाठी वेळ द्यायला वेळ मिळत नाही त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक-वैयक्तिक-कौटुंबिक विकासाला खीळ बसत आहे



२. कार्याचे अवमूल्यन आणि मानवी हक्कांची हेटाळणी : नोकरीची बांधिलकी म्हणून २४ह्व७ काम करून घेणे, आणि सेल्फी अटेंडन्स तसेच बायोमेट्रिक अटेंडन्स आणून २४ह्व७ केलेल्या कामाचे अवमूल्यन करून ते आठ तास दाखवणे शारीरिक आणि मानसिक पिळवणूक करून घेणे. ४०ते ४५% रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार तर दिला जातोच परंतु स्वत:च्या कामासोबत अतिरिक्त कामाचे अतिरिक्त काम टार्गेट स्वरूपात पूर्ण करून देण्याची जबाबदारी दिली जाते. सोबतच अतिरिक्त कामाचे टार्गेट पूर्ण झाल्यास न झाल्यास कायद्याचा बडगा आणि शासकीय कार्यवाही आहेच. त्यामुळे शारीरिक मानसिक पिळवणूक होतच आहे, मानव हक्क अधिकार यांची हेटाळणी होत आहे. कुटुंबासाठी गरज असेल तेव्हा रजा सुद्धा लवकर मिळत नाहीत रजेवर असल्यास ते ऑनलाईन काम आहे ते पूर्ण करणे बंधनकारक असते. म्हणजेच तिच्या कामासाठी पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध होत नाही कारण सध्या असलेले ४० ते ४५ टक्के रिक्त पदे तिप्पट काम करू तिप्पट काम तिप्पट कार्यक्षमतेने करताना नर्सेस ची होणारी शारीरिक मानसिक हानी यामुळे याच नर्सेस मानसिक आजाराला बळी पडत आहेत. ज़िल्हा परिषद आरोग्य विभाग अंतर्गत २४-२४ तास राबवून घेताना तिच्या मानव हक्काची हेटाळणी मानसिक कुचंबणा बऱ्याच अंशी होत आहे. या अतिरिक्त कामाचा कसलाही आर्थिक मोबदला किंबहुना शाब्दिक प्रशंसा सुद्धा मिळत नाही. उलट काम कमी असल्यास कायद्याचा बडगा मात्र एक स्त्री कर्मचारी म्हणून लगेच उचलला जातो

३. मूलभूत हक्काची पायमल्ली

१२५ ते ३०० स्क्वे. फु. क्षेत्रफळ असलेल्या गळक्या,पडक्या,स्मशान भूमी जवळील निवासस्थानात राहायची सक्ती करून नर्सेसच्या मूलभूत हक्काची पायमल्ली होते.

४. कार्यात्मक शारीरिक क्षमता रिक्त पदाचा आढावा न होता शासनाकडून अनेक योजना, ऑनलाइन पोर्टल आणले जातात आम्ही मान्य करतो की त्या योजना समाजाच्या रुग्णाच्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी असल्या तरी आमची शारीरिक क्षमता आणि रिक्त पदाचा आढावा न घेतल्यामुळे परिचारिकांना या अतिरिक्त कामामुळे परिचारिकांना त्यांच्या हक्काची कुटुंबाच्या हक्काची एक दिवसाची रविवारची सुट्टी देखील मिळणे मुश्किल झाले आहे.

५. काल ११ मे इंटरनॅशनल मदर्स डे आज १२ मे इंटरनॅशनल नर्सेस डे हा निव्वळ योगायोगच परंतु या योगायोगातच राज्यातील सर्व नर्सेस शासन-प्रशासन-मानवहक्क आयोग, महिला हक्क आयोग यांना विनंतीपूर्वक विचारणा आणि मन:पूर्वक मागणी करत आहार की,

जागतिक महामारी मध्ये कोविड रुग्णांच्या सोबत घरचे नातेवाईक सुद्धा नसताना या रुग्णाची मातेसमान काळजी घेऊन अनेकांना मरणाच्या दारातून परत आणत कोविड सारख्या आजाराला हरवण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या महाराष्ट्रातील जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागातील कार्यरत नर्सेस ना न्याय कधी मिळणार?

टीप: नियुक्ती प्राधिकारी ग्रामविकास विभाग तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद नर्सेस संघटनेने वारंवार पत्र व्यवहार करूनही प्रदीर्घ कालापासून आम्हाला न्याय मिळाला नाही

सौ. मिनाक्षी मनोज मुदगल
राज्यध्यक्षा
महाराष्ट्र जिल्हा परिषद नर्सेस संघटना
एन.जी.पी.३१३०

# मराठीचे संवर्धन मराठी माणसाने केले पाहिजे -प्राचार्य डॉ दीपा क्षीरसागर

माजलगाव : अमर साळवे (दै.महाभारत)

मराठी भाषा टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आली आहे. मराठीचे संवर्धन मराठी माणसाने केले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ . दीपा क्षीरसागर यांनी केले. माजलगाव येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या निसर्गरम्य परिसरात आयोजित १६ व्य शिवार साहित्य संमेलनाच्या उद्घाटक म्हणून डॉ .दीपा क्षीरसागर बोलत होत्या. त्यावेळी संमेलनाध्यक्ष ना.मा. पडलवार, मराठवाडा साहित्य परिषदेचे नवनिर्वाचित सदस्य अनंत कराड, निमंत्रित सदस्य प्रभाकर साळेगावकर, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य देविदास फुलारी, स्वागताध्यक्ष भारत होके, मसापचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके, उपाध्यक्ष प्रा. स्नेहल पाठक, कार्यवाह डॉ. भाऊसाहेब राठोड, कोषाध्यक्ष किशोर गुंजकर यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ दीपाताई क्षीरसागर म्हणाल्या की मराठवाडा साहित्य परिषद शाखेने कार्यक्रमाचे सातत्य ठेवले आहे. मसापच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक साहित्यिक उपक्रम घेतले जातात. या साहित्य संमेलनामुळे कलावंतांना, साहित्यिकांना संधी मिळते. नवोदित




साहित्यिकांना सल्ला देताना त्या म्हणाल्या की, नवोदित साहित्यिकांनी सुरुवातीला वाचन केले पाहिजे. शेतीमातीत काम करणारा शेतकऱ्याचा मुलगा अस्सल साहित्य लिहू शकेल. इंद्रजीत भालेराव, रा रं. बोराडे, आनंद यादव, प्रा.भास्कर चंदनशिव, श्रीकांत देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा साहित्यात मांडल्या. आज शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. आधुनिकीकरणामुळे कृषी जीवन उद्ध्वस्त होत आहे. लोक पुणे, मुंबईकडे जात आहेत. बेकारी वाढली आहे. शिक्षण घेऊन तरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मुले आई-वडिलांना सांभाळत नाहीत. शेतकऱ्यांचे विजेचे प्रश्न सोडवले पाहिजेत. अंधश्रद्धा, बालविवाह, शेतकऱ्यांचे प्रश्न साहित्यिकांनी मांडले पाहिजेत. शेतकऱ्यांचे महत्त्व वाढले पाहिजे, कारण शेतकरी पोटाला दाणे देतात. शेतकऱ्यांची मुलं काय करतात याकडे लेखकांनी लक्ष दिले पाहिजे. शेतकऱ्याच्या मुलांनी शिक्षण घेऊन नैपुण्य प्राप्त केले पाहिजे. आणि स्वतःच्या पाया उभे राहिले पाहिजे. दंगडलीत गरिबांच्या मुलाचा बळी जात आहे. त्यामुळे मुलांनी अभ्यास करावा, शिक्षण घ्यावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी कवी स्वप्नील चौधरी यांची चल दंगल समजून घेऊ ही कविता सादर केली. तरुणांनी स्वावलंबी बनावे असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी संमेलनाध्यक्ष ना.मा. पडलवार म्हणाले की , बीड जिल्ह्याला सकारात्मक अंगाने पुढे आले पाहिजे. तरुणांनी वाचन केले पाहिजे. प्रत्येकाच्या घरात किमान ५० पुस्तकांचे संग्रहालय असावे. आपण सर्वांनी मतभेद विसरून जवानांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे . यावेळी प्रभाकर साळेगावकर ,अनंत कराड, भारत होके यांची समायोचित भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी केले तर आभार खेलबा काळे यांनी मांनले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गीता होके व त्यांच्या संचाने पुष्पांजली व गणेश कौतुकम हे कथ्थक सादर केले. कुणाल कुलकर्णी, ऋषिकेश पडलवार यांनी मराठी गीत सादर केले. यावेळी गेणू शिंदे, गौरी देशमुख, प्रा. संगीता जाधव, बालासाहेब झोडगे, प्रा. डॉ. उमेश साडेगावकर, डॉ. प्रज्ञा जोशी, स्मिता लिमगावकर, डॉ. मीनाक्षी निळेकर, रामकिसन सोळंके , अभय होके पाटील, नारायण होके, बंडू शेजुळ, शिवाजीराव शेजूळ, बालाप्रसाद चव्हाण, मोहन राठोड, विठ्ठलराव सोळंके, गोविंद बजाज ,सतीश दुगड, डॉ. राजेश रुद्रवार ड.सतीश शिंदे, आनंद मोगरेकर, संदीप शिनगारे, रामानंद भंडारी, जगदीश पोपळे यांच्यासह साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित होती.



# विद्युत सहाय्यक पदी निवड

धारूर / अशोक सुरवसे (दै.महाभारत)

महापारेशनच्य वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत विद्युत सहायक म्हणून धारूर तालुक्यतील आसोला येथील सौ प्रतिक्षा प्रदिप सुरवसे यांची विद्यूत साहय्यक पदि निवड झाली शहरातील गोरगरिबांचे लेकरं यशस्वी झाल्या बददल सर्व स्थरातून अभिनंदन होत आहे शुभेच्छा देत आहेत सावंत सर यांनी त्यांचा सत्कार करून गुणगौरव केला आहे. त्याबद्दल सर्व पालक व विद्यार्थ्यांनी यशस्वी तरुणांनी त्यांचे आभार मानले आहेत.

राज्यामध्ये ३ फेब्रुवारी रोजी महापारेषणच्या वतीने घेण्यात आलेल्या विद्युत सहाय्यक पदाच्या परीक्षेचा निकाल ६ मे रोजी जाहीर झाला. या परीक्षेमध्ये धारूर येथील विद्यार्थ्यांनी परीक्षेत यश संपादन केले आहे सर्व स्तरावरून अभिनंदन चा वर्षाव होत आहे घवघवीत यश संपादन करून परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्याच्या या यशाबद्दल डॉक्टर

# लोकनेते सुंदरराव सोळंके कारखान्याचे इन्स्ट्रुमेंटेशन मॅनेजर रामेश्वर सदरे यांना बेस्ट इन्स्ट्रुमेंटेशन मॅनेजर पुरस्काराने सन्मानित

माजलगाव : अमर साळवे (दै.महाभारत)

लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखानाचे इन्स्टुमेंटेशन मॅनेजर मा. श्री रामेश्वर पांडुरंगराव सदरे यांना कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया तर्फे बेस्ट इन्स्ट्रुमेंटेशन मॅनेजर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया तर्फे सण २०२४ करिता देण्यात येणारा उत्कृष्ट सामग्री (इन्स्टुमेंटेशन) व्यवस्थापक (सहकारी व जादा बॉयलर क्षमता गट) हा पुरस्कार लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना,तेलगाव चे इन्स्ट्रुमेंटेशन मॅनेजर, मा.श्री रामेश्वर पांडुरग सदरे साहेब यांना प्राप्त झालेला आहे. हा पुरस्कार सोहळा हॉटेल ऑर्चिड, बाणेर, पुणे येथे दिनांक १९




एप्रिल २०२५ शनिवार रोजी संपन्न झाला. त्यावेळी पुरस्कार देताना देशाचे माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा खासदार व कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष मा.श्री शरदचंद्रजी पवार साहेब,महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा.श्री बाबासाहेब पाटील साहेब, महाराष्ट्र राज्याचे माजी ग्रामविकासमंत्री मा.श्री हर्षवर्धन पाटील साहेब, कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष श्री मा.श्री जयप्रकाशजी दांडेगावकर साहेब, तसेच तसेच सत्कारमूर्ती श्री रामेश्वर सदरे यांचे वडील श्री पांडुरंग हरिभाऊ सदरे आदी मान्यवर उपस्थित होते .श्री रामेश्वर पांडुरंग सदरे साहेब यांचे सर्व स्तरातून अभिनंदन

# ईश्वर तांबडे यांच्यावतीने महापारेषण मध्ये भरती झालेल्या तरुणांचा सत्कार

## शेतकऱ्यांच्या मुलांनी आदर्श घ्यावा : सोमनाथ (भाऊ) बडे

दत्ता कराड / बीड
(दै.महाभारत)

अत्यंत गरीब परिस्थितीतून अभ्यास करत व तिघेही एकाच शाळेत शिकून पुढे सोबतच अभ्यास करून ऊसतोड कामगार यांची मुल भरती झाले.महापारेषण ही राज्य शासनाची एक वीज वाहक कंपनी असून, दि.२२ जून २०२३. रोजी कंपनीने जाहिरात क्रमांक ०८ रीळींरपीं िंशलहपळललरप या पदासाठी जाहिरात प्रकाशित केली होती. याच पदाची परीक्षा, दि.०३ फेब्रुवारी २०२५ रोजी पार पडली. व त्याचा निकाल दि. ०६ मे २०२५ रोजी लावण्यात आला. याच निकालात चि. पवन तात्या कोठुळे (रँक -४५) चि .ओमकार लक्ष्मण मात्रे.(रँक-७८) चि. आदिनाथ अंगद मात्रे रवींद्र हनुमंत आंधळे पिंपळा गावचे



(रँक-९२७) यांनी घवघवीत यश प्राप्त केले. त्यामुळे चिंचवण व चिंचवण परिसरात त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. चिखलीबीड जिल्हा परिषद व वडवणी तालुक्यातील डोंगर पट्ट्यात असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी याचा आदर्श घेऊन शिक्षणावर जोर द्यावा. असे मत सोमनाथ भाऊ बडे यांनी केले. दरवर्षी युवा नेतेश्वर तांबडे यांच्या माध्यमातून सरकारी नोकरीमध्ये लागलेल्या ऊसतोड मजूर शेतकरी यांच्या मुलांच्या पाठीवर हात . व त्यांना शाब्बासकी देण्याचे काम ईश्वर तांबडे व मित्रमंडळ करत असतात. आज तो कार्यक्रम पार पडला यावेळी निवृत्त शिक्षक महबूब शेख सर यांचा देखील निवृत्त झाल्यामुळे चिंचवन गावकऱ्यांच्या वतीने व ईश्वर तांबडे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.नियोजन भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष ईश्वरजी तांबडे व समस्त गावकरी मंडळींनी . याप्रसंगी , सोमनाथ भाऊ बडे ,डॉक्टर अंगद तांबडे, प्रताप दादा मात्रे, शेख सर, शिवाजीराव कोठुळे, हनुमंत मात्रे, विष्णू कोठुळे, बालासाहेब बडे, डॉक्टर तांबडे साहेब, सुरेश दोडताले, देवानंद तांबडे ,शेख नाजम ,हरिराम बडे, गोवर्धन कोठुळे, शिवाजी दोडकाली, बालासाहेब तुरे ,तात्याराम कोठुळे ,ज्ञानेश्वर बडे, विश्वनाथ बडे,अखिल कोठुळे, वाघा मात्रे, अशोक मात्रे ,साहिल शे शेख गावकरी उपस्थित होते .

# सावता प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हाध्यक्ष राऊत आणि ग्रामसेवक घाडगे यांचा सत्कार!

बीड / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

माळी समाजाची अग्रगण्य संघटना म्हणजे सावता परिषद होय.सावता परिषदेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी श्री किशोर राऊत यांची पुनर्नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टच्या अर्थात सावता प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना राऊत म्हणाली की,अल्पावधीतच सावता प्रतिष्ठानने माळी समाजात जागृती आणि ईर्षा निर्माण केलेली आहे.सुसंस्कृत आणि जागृक नागरिक निर्माण करण्याचे हे एक निर्मळ व्यासपीठ तयार झाले आहे. आतापर्यंत प्रतिष्ठाने समाजाच्या बैठका,गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी कार्यक्रम, समाजातील आदर्श गुणवान नागरिकांचा सत्कार असे विविध कार्यक्रम घेतले आहेत. सावता महाराजांचे हे केवळ मंदिर नसून महाराजांना अपेक्षित असणारा कर्मप्रधान संस्कृतीवर आधारित समाज निर्मितीचा संकल्प साकार करणारे हे एक विचारपीठच आहे असे गौरवोद्गार



नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष किशोर राऊत यांनी काढले आहेत. मंगल कार्यालय, छोटे वस्तीगृह, जिम,वाचनालय हे उपक्रम पूर्ण करण्याचा निर्णय मंदिर ट्रस्टने

घेतला आहे. सावता परिषद आणि आमचे नेते संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे या मंडळीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहील अशी ग्वाही यावेळी राऊत यांनी दिली.प्रारंभी ट्रस्टच्या वतीने श्री किशोर राऊत आणि राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श ग्रामसेवक श्री रामेश्वर घाडगे यांचा हृदय सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महादेवनाना दुधाळ हे होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी ट्रस्टने केलेल्या कामांचा आढावा घेतला. भाविकाळात घ्यावयाच्या उपक्रमाबद्दल माहिती दिली. माळी समाजाच्या सहकार्यानेच हा वटवृक्ष होत आहे असे सांगून ते म्हणाले की राज्यकर्त्या मंडळींनी आता सावता प्रतिष्ठानला सहकार्य करण्याची गरज आहे. आणि आपण ते सहकार्य घेत आहोत.कार्यक्रमास सर्व विश्वस्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्री श्यामसुंदर घाडगे यांनी केले.

# सिस्पे मल्टीपर्पज अर्बन निधी लिमिटेड कंपनीने घातला कोट्यावधी रुपयांना गंडा

श्रीगोंदा/विजय मांडे
(दै.महाभारत)

शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवून महिन्याला गुंतवणूकीवर १० ते १२ टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून सुरुवातीला गुंतवणूकदारांना लाख रुपयांना महिना १० ते १२ हजार रुपये देऊन हजारो कोटी रुपये एजंटच्या माध्यमातून गोळा केले मात्र आता दोन महिन्यापासून दहा टक्केचा ट्रेड ही नाही आणि मुदलही मिळत नसल्याने सिस्पे कंपनीत गुंतवलेली मुद्दल तरी मिळावी यासाठी हजारो गुंतवणूकदार कंपनीच्या कडे डोळे लाऊन बसले आहेत.

सविस्तर वृत्त असे की,सुमारे तीन ते चार वर्षांपूर्वी श्रीगोंदा तालुक्यात थाटामाटात कॉर्पोरेट मल्टिनिधी संस्था सुरू केली,या सिस्पे नावाच्या या कंपनीत पैसे गुंतवल्यावर प्रति लाखाला १० ते १५ टक्के ट्रेड म्हणजे लाख रुपयांना १० ते १५ हजार प्रतिमहिना दिले गेले.या लाभाच्या अमिषाने या कंपनीत गुंतवणूकदाराची रीघ लागली.कुणी पदरचे पैसे गुंतवले,कुणी जास्त परतावा मिळतो म्हणून कर्ज काढले,जमिनी,जागा विकून इथ गुंतवणूक केली. वेळप्रसंगी सावकार,बँकेकडून कर्ज काढून सिस्पे मध्ये पैसे गुंतवले या गुंतवणूकीवर परतावा ही भेटत गेला मात्र मागील तीन महिन्यापासून गुंतवणूकदारांना पैसे मिळत नाही.ज्यांनी पैसे विड्रोलला टाकले त्यांना पैसे मिळण्यासाठी थांबावं लागत आहे. ज्या कंपनीच्या साईट बंद अपडेट चालू आहे असे सांगूना गेल्या अनेक महिन्यांपासून 'तोंड दाबून बुक्यांचा मार' सहन करणारे गुंतवणूकदार आता पोलीसात जाण्याच्या तयारीत आहेत.

# मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या सदस्यांनी एकत्र येवून कार्य करावे- जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै. महाभारत)

पुढील काळ सर्व पत्रकारांसाठी आव्हानात्मक असून अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या सर्व सदस्यांनी एकत्र येवून कार्य करावे,असे मत मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी व्यक्त केले. आज दुपारी अंबाजोगाई शहरातील बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कक्षात मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशावरून मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाची बैठक संपन्न झाली.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हाकार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवि उबाळे हे उपस्थित होते.तर व्यासपीठावर जिल्हा समन्वयक दत्तात्रय अंबेकर व अंबाजोगाई पत्रकार वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ.राजेश इंगोले यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष विशाल सांळुके म्हणाले की,बीड जिल्हयात अंबाजोगाई शहराचे नाव लौकिक आहे.मराठी पत्रकार परिषदेचे सर्वात जास्त कार्यक्रम हे अंबाजोगाईत होतात.मराठी पत्रकार परिषदेच्या सदस्यामुळेच संघटनेची ओळख असते.अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीया हे एकाच छताखाली कार्य करतात.विश्वस्त एस.एम.देशमुख यांचे कार्य महाराष्ट्रात सर्वदूर आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या सदस्याच्या सुखदुःखात सदैव साथ देणारी ही पत्रकार संघटना आहे. या बैठकीत शेवगाव येथे होणारया आगामी अधिवेशना बाबतही चर्चा करण्यात आली



तसेच मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अंबाजोगाई येथे डीजीटल कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल.आधुनिक तंत्रज्ञान आणि डीजीटल बातम्यातील बारकावे आदीची माहिती डीजीटल मिडीयाच्या पत्रकारांना ज्ञात व्हावे या करिता लवकरच कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल अशी माहितीही सांळुके यांनी दिली. तर विभागीय सचिव रवि उबाळे यांनी ही आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की, बीड जिल्ह्यातील मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या सर्व सदस्य हे संघाचे अंगभूत नेतृत्व करणारे सदस्य आहेत.विशेष करून अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषदेचे सर्व सदस्यांचे कार्य उल्लेखनीय असून विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या सूचनेवरून लवकरच अंबाजोगाई शहरात डीजीटल कार्यशाळेचे आयोजन कसे होईल याचा विचार केला जाईल असे ही शेवटी बोलताना म्हणाले.

तर अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषदेचे वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी पत्रकार आणि डॉक्टर यांचे कार्य एकच आहे.डॉक्टर जीव वाचवतात तर पत्रकार अन्यायाला वाचा फोडतात.तेव्हा विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात ठिकठिकाणी वैद्यकीय कक्ष प्रमुख म्हणून डॉक्टरांची नेमणूक करणार असून पत्रकारांनी कुठलेही मतभेद न ठेवता कार्य करावे,असे मत व्यक्त केले.या बैठकीचे सुत्रसंचलन पुनमचंद परदेशी,प्रास्ताविक सतिश मोरे तर आभार प्रदर्शन ज्ञानेश मातेकर यांनी केले.या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली.यावेळी,मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्ष मारोती जोगदंड, डिजीटल मिडीयाचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे, उपाध्यक्ष संजय जोगदंड,विरेंद्र गुप्ता,एम.एम.कुलकर्णी,सलीम गवळी,वासुदेव शिंदे,बालाजी खैरमोडे,जोशी,सालेम पठाण, अशोक कोळी,अनिरुद्ध पांचाळ, अमोल माने,सचिन मोरे,संजय रानभरे,अरेफ भाई,योगेश डाके



# धर्मग्रंथांवर आधारित पुस्तक प्रचार मोहीम :सुसंस्कृत समाजनिर्मितीचा अभिनव उपक्रम

माहूर (दै.महाभारत)

११/०५/२०२५ जगतगुरु तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांच्या अनुयायांनी, भगवद्गीता, गुरु ग्रंथ साहिब, कुराण शरीफ आणि बायबल या प्रमुख धर्मग्रंथांच्या सिद्ध ज्ञानावर आधारित ज्ञान गंगा, जीने की राह आणि गीता तेरा ज्ञान अमृत या आध्यात्मिक पुस्तकांचे प्रचार व वितरण बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात व्यापक प्रमाणावर केले. रविवारी विविध बाजार, गावे तसेच घरोघरी पोहोचून शेकडो श्रद्धाळू या पुस्तकांचे वितरण करताना दिसले. भाविकांनी लोकांना ग्रंथ वाचण्याचे महत्त्व समजावून सांगत त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आग्रह धरला. संत रामपाल जी महाराज यांच्या अनुयायांचे म्हणणे आहे की, या पवित्र ग्रंथांच्या वाचनामुळे लाखो लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आले आहेत. अनेकांनी वाईट सवयी सोडून शुद्ध व सदाचारी जीवनाचा मार्ग स्वीकारला आहे. या उपक्रमाचा प्रमुख हेतू म्हणजे आध्यात्मिक अज्ञान व गैरसमज दूर करून शुद्ध,

आध्यात्मिक ज्ञानाचा समाजात प्रचार करणे तसेच एक सुसंस्कृत, सदाचारी व समतावादी समाज घडविणे हा आहे. कायद्याच्या चौकटीत राहून योग्य ज्ञानाच्या प्रसारानेच समाजातील वाईट प्रवृत्ती व अंधश्रद्धा नष्ट होऊ शकतात, असा दृढ विश्वास या शिष्यवृंदाने व्यक्त केला. या आधीही महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये संत रामपाल जी महाराज यांच्या अनुयायांनी धार्मिक ग्रंथांचे वितरण करून लोकांमध्ये आध्यात्मिक जागृती घडवली आहे. या पुस्तकांच्या वाचनामुळे लोकांना केवळ आत्मिक शांती व समाधान मिळते असे नाही, तर जीवनात शिस्त, नीतिमत्ता आणि चारित्र्य या मुल्यांचीही रुजवणूक होते.

# भारतीय बौद्ध महासभेच्या तृतीय अध्यक्षा महा उपासिका मीराताई य. आंबेडकर यांना राष्ट्रीय पुरस्कार देण्याचा निर्णय

## एकाच वेळा ११६ शिबिरे राबवून कार्यकर्त्यांनी कार्यातून वाढदिवस साजरा केला

मुंबई (दै.महाभारत)

प्रशिक सम्राट यांच्याकडून महाउपासिका मीराताई आंबेडकर आज ५ मे अर्थात आदरनिय मिराताई आंबेडकर यांचा ९० वा वाढदिवस ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर घराण्याने त्यागाची नवी परिभाषा समाजातं रुजविली आपल्या पोटची पोरं औषधा अभावी माती आड जातं होती त्याची तमा न बाळगता समाजाच्या करोडो लेकरांच भविष्य उज्वल व्हावे म्हणून आयुष्यभर चंदनासारखे झीजले स्वतःच्या घरात अंधार करून ज्ञानाचा नवा प्रकाश घरा घरात पसरविला रंजल्या गांजल्या उपेक्षित समस्त समाजाला खालच्या पायदानावरूण वरच्या पायदानवर आणून बसविले त्या आंबेडकर कुटुंबाच्या प्रमुख व भारतीय बौद्ध महासभे च्या तृतीय अध्यक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुनबाई महाउपासिका मीराताई आंबेडकर यांनी गेल्या ४५ वर्षापासून संस्थेचे काम पाहत आहेत संस्थेचे द्वितीय यशवंतराव आंबेडकर यांच्या पावलावर पाऊल ठेवून मीराताई यांनी वयाच्या ४५ वर्ष राष्ट्रीय अध्यक्ष पद भूषविले, दिनांक ५ मे २०२५ रोजी महाउपासिका मीराताई आंबेडकर यांनी ९० व्या वर्षाचा संघर्ष पार करून ९१ वर्षात पदार्पण करत असताना ताईंचे ज्येष्ठ सुपुत्र व वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष सन्माननीय ड. प्रकाश यशवंतराव आंबेडकर. दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे ट्रस्टी/राष्ट्रीय अध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीयध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर, रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष सरसेनानी आनंदराज यशवंतराव आंबेडकर, व मीराताई यशवंतराव आंबेडकर, यांचे नातू आणि आनंदराज आंबेडकर, यांचे पुत्र अमन या लाडक्या नातवाच्या हस्ते सार्वजनिक रित्या केक कापून आपल्या लाडक्या आजीला आपल्या हाताने केक भरून ९० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने फुल गुच्छ देऊन हार्दिक शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम दिनांक ५ मे २०२५ सोमवार या दिवशी डॉ. आंबेडकर भवन, दादर येथे मुंबई प्रदेश शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. भीमराव य आंबेडकर, राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रिय कार्यालय प्रमुख अँड. एस के भंडारे, माजी महासचिव व प्रसिध्द साहित्यिक ज. वि. पवार, राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रिय महिला विभाग प्रमुख सुषमाताई पवार, राष्ट्रीय सचिव बी. एच. गायकवाड, भिकाजी कांबळे, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यू जी बोराडे, स्वातीताई शिंदे, नितिन मोरे, मुंबई प्रदेश महिला अध्यक्ष चंदाताई कासले, इत्यादींनी शुभेच्छा दिल्या. यावेळी अँड. एस के भंडारे यांनी महा उपासिका मीराताई आंबेडकर. यांच्या नावाने उत्कृष्ट काम करणाऱ्या पुरुष व महिला सैनिकांना राष्ट्रीय पुरस्कार देण्याचे जाहीर करण्यात आले. महा उपासिका मीराताई आंबेडकर. अर्थात दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचा दस्तावेज या पुस्तकाची दुसरी आवृत्ती चैत्यभूमीचे निर्माते व बौद्धाचार्यांचे जनक आदरणीय सूर्यपुत्र भय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर गौरव ग्रंथांच्या आवृत्तीचे प्रकाशन तिसऱ्यांदा जाहीर करण्यात आले. तसेच आदरणीय मीराताई यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने संस्थेच्या ज्या ठिकाणी शाखा असतील त्या सर्व



शाखेच्या कार्यकर्त्यांनी, देशभरात विविध प्रकारचे ११६ शिबिरे आयोजित करून वाढदिवस साजरा करण्यात आला. मुंबईतील महिला शाखा व पुरुष शाखेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या १४ उपासिका शिबिराच्या शिबिरार्थींना डॉ. भीमराव य आंबेडकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास पूज्य भंते धम्मराज व त्यांचा भिक्खू संघ. राष्ट्रीय सचिव व केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख अँड. डॉ एस एस वानखडे, राष्ट्रीय सचिव बी एम कांबळे, राष्ट्रीय कोषाध्यक्ष सी बी तेलतुंबडे, केंद्रीय महिला विभाग उपप्रमुख रागिणीताई पवार व सचिव भारतीताई शिराळ, प्रशांत गडकरी, सोनाली कटरनवरे इत्यादी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम आपल्यानंतर राजगृह वर जाऊन मीराताई आंबेडकर यांना प्रत्यक्ष शुभेच्छा दिल्या. केंद्रीय कार्यालयाच्या केंद्र, महाराष्ट्र मुंबई प्रदेश पदाधिकारी यांच्या वतीने एक लाख रुपये धम्मदन देण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुंबई प्रदेशचे अध्यक्ष विलास वानखडे होते. सूत्रसंचालन मुंबई प्रदेश सरचिटणीस दयानंद बडेकर आणि आभार प्रदर्शन मुंबई प्रदेश कोषाध्यक्ष राजेंद्र सत्वधीर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुंबई प्रदेशचे विलास ढोबळे, महादेव गायकवाड, अनिल पहूरकर, अर्जुन जाधव, मिलिंद कदम कामगार ट्रान्सपोर्ट महाराष्ट्र युनियन संघटक सुनील लोखंडे इत्यादींनी परिश्रम घेतले..

# अक्षता सुर्यवंशी हिचा मराठी पत्रकार परिषद अंबाजोगाई शाखेच्या वतीने सत्कार

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै. महाभारत)

बर्दापूर येथील पत्रकार गोविंद सुर्यवंशी यांची कन्या कु.अक्षता सुर्यवंशी याची महापारेषण विभागात विद्युत साहय्यक पदी निवड झाल्याबद्दल मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजिटल मीडिया शाखा अंबाजोगाई च्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. दरम्यान अंबाजोगाई शहरातील बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कक्ष या ठिकाणी कु. अक्षता सूर्यवंशी याचा मराठी पत्रकार परिषदेचे बीड



जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, विभागीय सचिव रवि उबाळे, जिल्हा समन्वयक दत्तात्रय अंबेकर, बीड जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, ज्येष्ठ पत्रकार एस. एम. कुलकर्णी, वीरेंद्र गुप्ता, तसेच परिषदेचे पदाधिकारी व सन्माननीय सदस्य यांच्या हस्ते कु.अक्षता चा सत्कार करण्यात आला. यावेळी अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजिटल मीडिया चे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# फुले शाहू आंबेडकर चळवळीचे नेते गणपत बनसोडे यांचे दु:खद निधन

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

फुले शाहू आंबेडकर चळवळीचे नेते गणपत बनसोडे यांचे अल्पशा आजाराने रविवार दि.११ मे रोजी सकाळी ११वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे त्यांच्या पार्थिव देहावर नागापूर येथे सायंकाळी ६ वाजता शोकाकुल अंत्यसंस्कार करण्यात येणार आले समाजभूषण पुरस्कार प्राप्त तसेच सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, माजी जिल्हा परिषद सदस्य, बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक, वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना पांगरी यांचे संचालक असणारे तसेच विविध



पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असणारे दलित चळवळीचे नेते गणपत आप्पा बनसोडे यांचे आज सकाळी ११.३० वाजता नागापूर येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आप्पाच्या जाण्याने दलित समाजाची मोठी हानी झाली असल्याच्या शोकभावना व्यक्त होत आहेत. दिवंगत गणपत अप्पा बनसोडे यांच्या पश्चात पत्नी तीन मुलं मुली नातवंड असा मोठा परिवार आहे.

रक्षा विधी कार्यक्रम उद्या

दिवंगत गणपत अप्पा बनसोडे यांचा रक्षाविधी कार्यक्रम मंगळवार दि.१३ मे रोजी सकाळी ८ वाजता होणार असल्याचे शोकाकुल बनसोडे परिवाराकडून कळविण्यात आले आहे